घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती


सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

श्री चैतन्य टेस्ट ट्युब बेबी सेंटर
तुमच्या मातृत्वाच्या स्वप्नांना आमची साथ..!
आपले आई-बाबा होण्याचे स्वप्न आता पूर्ण होईल!

११
६०००+
8484-86-1900
» शाखा «
बारामती | सातारा | अहिल्या नगर

वर्ष २९ वे | अंक ६३ | पाने ६ | गुरुवार | दि. ३ जुलै २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# शेतकऱ्यांच्या मुद्यावरून विधिमंडळात गदारोळ

## कर्जमाफी व लोणीकरांच्या मुद्द्यावर विरोधक अक्रामक

***मुंबई/प्रतिनिधी:-***

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शेतकरी कर्ज माफीचा मुद्दा चांगलाच गाजला. या प्रश्नावर विरोधक चांगलेच आक्रमक झाले असून काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी या विषयावर स्थगन प्रस्ताव मांडला. मात्र, अध्यक्षांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. तर बबनराव लोणीकरण यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी यासाठी विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला तर लोणीकर यांनी मी असे बोललो नाही असे सांगून जर शेतकऱ्यांना वाटत असेल तर मी हजारवेळा माफी मागायला तयार आहे. मात्र या मुद्दयावरून विरोधकांनी सभात्याग केला.

सरकार शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी २० हजार कोटी मंजूर करते. पण शेतकरी कर्जमाफी साठी सरकारकडे पैसे नाहीत का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. त्याला सत्ताधारी पक्षानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. शेतकऱ्यांच्या आडून विरोधक राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी देखील काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले होते. माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या वक्तव्यावरुन कृषिमंत्री आणि लोणीकर यांनी माफी मागण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यासाठी त्यांनी थेट राजदंडला स्पर्श केल्याने अध्यक्षांनी त्यांना एका दिवसासाठी निलंबित केले होते. त्यानंतर आता दुसऱ्या दिवशी वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्ताव मांडत शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा करण्याची मागणी केली होती. हा प्रस्ताव अध्यक्षांनी स्विकारला नाही.

राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहे. दररोज शेतकरी आत्महत्या होत आहे. राज्यात यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. यातील २०० प्रकरणे अपात्र ठरली असून १९४ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या होतात त्यांना मदती ही सरकार देत नसल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकऱ्यांविरोधात आक्षेपार्ह विधान करतात आणि त्यांचा अपमान करतात.



शेतकरी कर्जमाफीसाठी समिती नको अशी भूमिका विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडली.

### विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आड लपून राजकारण करु नये



शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणे, शेतकऱ्यांना मदत करणे सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेले. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करु नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करीत विरोधी पक्ष सदस्यांना सभागृहात गोंधळ न घालण्याचे आवाहन केले.

### आषाढी वारीत शहरी नक्षलवादी



आषाढी वारीत शहरी नक्षलवाद्यांनी शिरकाव केल्याचा आरोप मनीषा कायंदे यांनी केला. या प्रकरणी सरकारने कारवाई करावी,असे शिवसेना आमदार मनीषा कायंदे म्हणाल्या.

## कर्नाटकातील दोन शहरांची नावे बदलली

***बंगळुरू/वृत्तसंस्था:-***

कर्नाटक काँग्रेसमध्ये मुख्यमंत्री पदावरून अंतर्गत कलह सुरू असल्याचे बोलले जात असतानाच, राज्यातील सिद्धरामय्या सरकारने बुधवारी (२ जुलै २०२५) दोन शहरांची नावे बदलण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात खुद्द मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी घोषणा केली आहे. यानुसार आता, बेंगळुरू ग्रामीण जिल्ह्याचे नाव बदलून बंगळुरू उत्तर तर बागेपल्लीचे नाव बदलून भाग्यनगर करण्यात आले आहे.

तत्पूर्वी, कर्नाटक सरकारने, मे २०२५ मध्ये रामनगर जिल्ह्याचे नाव बदलून बंगळुरू दक्षिण असे केले आहे. उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी या जिल्ह्याचे नाव बदलण्याचा प्रस्ताव मांडला होता. दरम्यान, गेल्या काही



दिवसांपासून कर्नाटक काँग्रेसमधील अंतर्गत कलहाच्या बातम्या सातत्याने येत आहेत. मात्र, पक्षात कोणतीही गटबाजी नाही. आम्ही एकजूट आहोत, असे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी स्पष्ट केले आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साधला उत्तराखंड येथील पर्यटकांशी संवाद

***सातारा/प्रतिनिधी:-***

उत्तराखंड जिल्हा उत्तरकाशी येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील पर्यटक अडकेले आहेत. या अडलेल्या पर्यटकांशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संवाद साधून त्यांना धीर दिला.

उत्तराखंड जिल्हा उत्तरकाशी येथे दि. ३० जून रोजी सिलाईबंद या ठिकाणी अतिवृष्टिमुळे चारधाम रस्ता वाहून गेला असल्याने महाराष्ट्रातील सर्वसाधारणपणे १५० पर्यटक अडकले आहेत. झांझवड ता. महाबळेश्वर येथील ६ पर्यटकांचा यामध्ये समावेश असून ते सध्या बडकोट येथे सुखरुप असल्याची माहिती घेतली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी झांझवड ता. महाबळेश्वर येथील पर्यटक आकाश जाधव यांच्याशीही भ्रमणध्वनीवरुन संवाद साधला. तेथील परिस्थिती बद्दल माहिती घेतली. प्रशासनाने केलेल्या मदतीबद्दल जाणून घेतले. काही अडचण असल्यास त्वरीत संपर्क साधण्याबाबत सांगितले. महाराष्ट्रातील पर्यटकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी उत्तराखंडचे



मुख्यमंत्री यांच्याशीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी संवाद साधला. यावेळी उत्तराखंडचे मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्रात अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षीत महाराष्ट्रात पाठविले जाईल, असे सांगितले. उत्तराखंड येथील स्थानिक प्रशासन सहकार्य करीत असून महाराष्ट्रातील पर्यटकांना सुरक्षीत ठिकाणी हलविण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या.

## पलूसच्या यश यादवच्या मृत्यूची सखोल चौकशी करा

***पलूस/प्रतिनिधी:-***

पलूस येथील यश अजित यादव या युवकाचा इचलकरंजी येथील एका नामांकित खासगी अकॅडमीत संशयास्पद मृत्यू झाल्याने संपूर्ण सांगली जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून त्यामागील सत्य उघडकीस यावे, दोषींवर कठोर कारवाई व्हावी यासाठी सखोल चौकशी केली जावी, अशी मागणी आमदार डॉ. विश्वजीत कदम यांनी केली आहे.



यश यादव हा अभ्यासात आणि क्रीडा क्षेत्रात अग्रेसर असलेला होतकरू विद्यार्थी होता. उच्च शिक्षणासाठी तो इचलकरंजीतील एका खासगी अकॅडमीत दाखल झाला होता. काही दिवसांपूर्वी त्याचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आला. ही बाब अत्यंत गंभीर असून यामागे नेमके कारण काय होते, हे शोधणे गरजेचे आहे.

डॉ. कदम म्हणाले की, अशा घटना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात गंभीर प्रश्न निर्माण करतात. त्यामुळे यशच्या मृत्यूच्या घटनेची पूर्ण चौकशी करण्यात यावी. त्यामागे कोणतीही हलगर्जीपणा, अत्याचार, मनस्ताप अथवा दुर्लक्ष असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी.

डॉ. कदम यांनी यादव कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि या दुःखद प्रसंगी ते त्यांच्यासोबत असल्याची ग्वाही दिली. त्यांनी प्रशासनाकडे लेखी स्वरूपात सखोल चौकशीची मागणीही केली आहे.

या घटनेची पारदर्शक चौकशी होऊन यशच्या मृत्यूमागील कारणांचा खुलासा व्हावा, अशी अपेक्षा आता सर्वत्र व्यक्त केली जात आहे.


## सहकारी उपसा सिंचन योजनांचा ‘जलद सिंचन लाभ कार्यक्रमात’ समावेश करा

### आ.डॉ.अतुलबाबा भोसले यांची विधानसभेत मागणी

***कराड/प्रतिनिधी:-***

राज्यात शेतकऱ्यांनी सहकार तत्वावर सुरू केलेल्या उपसा जलसिंचन योजनांना नवी उर्जा मिळवून देण्यासाठी या योजनांचा समावेश केंद्र शासनाच्या ‘जलद सिंचन लाभ कार्यक्रमात’ करावा, अशी ठाम मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुल भोसले यांनी आज राज्य विधानसभेत केली.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना आमदार डॉ. भोसले यांनी या विषयाला सभागृहात वाचा फोडली. ते म्हणाले, महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर उपसा



सिंचन योजना राबवल्या आहेत. या योजनांमुळे मोठ्या प्रमाणात शेती ओलिताखाली आली असून ग्रामीण भागाच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळाली आहे.

या योजनांची उभारणी करण्यासाठी अनेक ठिकाणी सहकारी साखर कारखान्यांनी देखील पुढाकार घेतला आहे. परिणामी, शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योग वाढले असून रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. परंतु, सध्या या योजनांना तांत्रिक व आर्थिक अडचणींमुळे अडथळे येत आहेत. त्यामुळे शासनाने या योजनांचा समावेश केंद्र शासनाच्या ’जलद सिंचन लाभ कार्यक्रमात’ करून त्यांना आवश्यक ती मदत द्यावी, अशी ठोस मागणी त्यांनी केली.

या योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने विशेष प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले. अशा प्रकारच्या योजनांना सरकारी पाठबळ मिळाल्यास, महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जलसिंचनाची क्रांती घडेल, असा विश्वास आमदार डॉ. भोसले यांनी यावेळी व्यक्त केला.

## घरकाम करणाऱ्या बाईने मारला सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला

### शाहूपुरी पोलिसांकडून गुन्हा उघड,साडेदहा तोळे दागिने हस्तगत

***सातारा/प्रतिनिधी:-***

शाहूपुरी अवधूत कॉलनी येथे घरात झालेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरी प्रकरणाचा शाहूपुरी पोलिसांनी कौशल्यपूर्वक तपास करून या प्रकरणाचा छडा लावला आहे .घरात काम करणाऱ्या महिलेने नऊ लाख साठ हजार रुपये किमतीच्या साडेदहा तोळे दागिन्यावर डल्ला मारला होता यांप्रकरणी सीमा संजय कोकरे वय ४२ राहणार देशपांडे मारुती मंदिर शेजारी चिंतामणी सोसायटी या महिलेवर गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी महेंद्र पवार राहणार अवधूत कॉलनी सातारा यांनी दिनांक १७ मे रोजी घरात दागिन्यांची चोरी झाल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दिली होती .पोलीस अधीक्षक तुषार दोशी व अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन म्हेत्रे यांनी आपल्या पथकाला विशेष तपासाच्या सूचना दिल्या .गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक के.डी . ढेरे यांनी तपास केला असता घर कामासाठी येणाऱ्या सीमा कोकरे या महिलेने चोरी केल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले.

फिर्यादीच्या आईचे निधन झाले असताना घरातील गडबडीच्या वातावरणाचा फायदा घेऊन या महिलेने नऊ लाख साठ हजार रुपये किमतीच्या साडेदहा डोळ्यांच्या सोन्याच्या दागिन्यावर डल्ला मारला हा संदर्भ घेऊन पोलिसांनी तपास केला फिर्यादी यांच्या घरी कोकरे यांच्या व्यतिरिक्त कोणीही यादरम्यान आले नव्हते म्हणून पोलिसांचा संशय बळावला . या महिलेची पोलिसांनी कसून चौकशी केली असता तिने सुरुवातीला उडवा उडवीची उत्तरे दिली मात्र गुन्ह्याच्या संदर्भाने प्रश्न विचारले असता तिने सोन्याचे दागिने

**पान ४ वर**

### मन मोकळे..

द्या वैधानिक इशारा
सगळे झाले मोकळे
जाहिरातीवरी श्रध्दा
विश्वास ठेवी निर्मळे
बारीकअस्पष्ट अक्षरे
अटींचा अर्थ ना कळे
सल्लागारांवर विसंबे
आम्ही निर्बुद्धठोकळे
इशारा देऊनसरकार
ते झाले नामानिराळे
जाहिरातीवरविश्वास
उडवत बसे भुसनाळे
सुपरस्टार झळकले
सल्ले देतात आगळे
गुंतवणूकीत जोखीम
चित्र विचित्र ते वेगळे
पैसे मुश्किले जोडून
बचत करतात भोळे
सल्लागार रे टपलेले
खिळे खिशावरडोळे
कमाई लावी जुगारी
डोक्या मातीचे गोळे
शेअरबाजार कोसळे
तेंव्हाचं गडबडालोळे

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## सातार्‍यात सकल हिंदू समाज्याचा जन आक्रोश मोर्चा

### धर्मांतर बंदी कायद्याच्या मागणीचे जिल्हा प्रशासनाला निवेदन

***सातारा/प्रतिनिधी:-***

सांगली येथील यशवंत नगर मध्ये राहणाऱ्या ऋतुजा राजगे या विवाहित तरुणीने ख्रिश्चन धर्मांतरणाच्या जाचाला कंटाळून सात महिन्याच्या गर्भावस्थेत स्वतःचे जीवन संपवले .या घटनेचे तीव्र पडसाद सातार्‍यात उमटले . यंदाच्या पावसाळी अधिवेशनात राज्यात धर्मांतर बंदी कायदा लागू झाला पाहिजे या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने शिवतीर्थ पोवई नाका येथे आंदोलनाकांनी जमून जोरदार घोषणाबाजी केली तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर तेथून मोर्चा काढण्यात आला.

पोवई नाक्यावरील या आक्रोश मोर्चाला शेकडो हिंदू बांधव जमा झाले होते त्यांनी धर्मांतर सक्तीच्या विरोधामध्ये जोरदार घोषणाबाजी केली या आंदोलनामध्ये तब्बल दीडशेहून अधिक बांधव सहभागी झाले होते .या मोर्चाला हिंदू समाज कृती समितीच्या वतीने वर्षा डहाळे व सचिन वाळवेकर यांनी संबोधित केले .राजगे कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी व राज्यात धर्मांतरांच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आगामी पावसाळी अधिवेशनामध्ये राज्यात धर्मांतर बंदी कायदा लागू करावा अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.



मोर्चात सहभागी झालेल्या सदस्यांनी सर्वप्रथम येथील पोवई नाक्यावरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले .तेथून मोर्चा थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मार्गस्थ झाला .धर्मांतर रोखण्यासाठी हिंदूंची एकजूट करूया सर्व हिंदू बांधवांनी जातीपातीचे भेद विसरून एकत्र येऊया सातारा हा पेन्शनदारांचा नाही तर क्रांतिकारकांचा जिल्हा आहे हे दाखवून देऊ या असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## ..तर काँग्रेस पक्षाला आरोपी बनवणार !

### नॅशनल हेराल्ड प्रकरणात ईडीचा न्यायालयात दावा

***नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-***

नॅशनल हेराल्डशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टात आज सुनावणी झाली. यावेळी ईडीने महत्त्वाच्या बाबी मांडल्या. जर आम्हाला पुरावे मिळाले तर आम्ही PMPLA च्या कलम ७० अंतर्गत काँग्रेस पक्षाला या प्रकरणात आरोपी बनवू शकतो. त्यांना आता आरोपी न बनवण्याचा अर्थ असा नाही की हे नंतर होणार नाही. पण सध्या आम्ही कोणत्याही पुराव्याशिवाय असे करणार नाही. राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांनी तपासात सहकार्य केले नाही आणि मोतीलाल व्होरा यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. त्यामुळे ईडीच्या चौकशीच्या कक्षेत काँग्रेस येण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे ईडीने सुनावणीत स्पष्ट केले. या प्रकरणातील ईडीचे पुढील युक्तिवाद राऊस अव्हेन्यू कोर्ट ३ जुलैला ऐकणार आहे.

बुधवारी या प्रकरणात ईडीच्या वतीने एएसजी एसव्ही राजू यांनी युक्तिवाद केला. त्यांनी सांगितले की, यंग इंडियनने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड विकत घेतले, ज्याची मालमत्ता २ हजार कोटी रुपयांची आहे. या अधिग्रहणासाठी यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना करण्यात आली होती. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या संचालकांनी काँग्रेसला लिहिलेल्या पत्रात लिहिले होते की, प्रकाशन बंद पडल्यामुळे आणि नियमित उत्पन्नाचा अभाव असल्याने ते कर्ज फेडू शकत नाहीत. त्यांनी असा युक्तिवाद केला की यंग इंडियनने सोनिया आणि राहुल गांधी हे त्याचे फायदेशीर मालक असल्याचे घोषित केले होते. सोनिया, राहुल, सुमन दुबे आणि सॅम पित्रोदा यांनी यंग इंडियनमध्ये महत्त्वाची पदे भूषवली. २००० कोटी रुपयांची मालमत्ता असलेली कंपनी ९० कोटी रुपयांच्या कर्जासाठी विकत घेण्यात आली. ही फसवणूक आहे.

असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड काँग्रेसने नाही तर यंग इंडियनने विकत घेतले. हे एक षडयंत्र होते. काँग्रेसने व्याज घेतले नाही किंवा सुरक्षा घेतली नाही. ९०



कोटी रुपयांचे कर्ज ५० लाख रुपयांना विकले गेले. हा एक गुन्हेगारी कट होता, ज्यामध्ये यंग इंडियनला बनावट कंपनी बनवण्यात आली, असा आरोपही वकिल राजू यांनी केला.

## वेगवेगळ्या घटनांमध्ये महिला व युवती बेपत्ता

***सातारा/प्रतिनिधी:-***

सातारा शहरासह तालुक्यात घडलेल्या वेगवेगळ्या घटनांमध्ये महिला व युवती बेपत्ता झाल्याच्या फिर्यादी संबंधित पोलीस ठाण्यांत नोंदविण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहर परिसरातून व सातारा तालुक्यातून महिला व युवती बेपत्ता झाली आहे. या दोन्ही घटनांची नोंद पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झाली आहे. दोन्ही घटना १ जुलै रोजी घडल्या असून पोलीस तपास करत आहेत.

## मोबाईल चोरी प्रकरणी अज्ञात महिलेवर गुन्हा

***सातारा/प्रतिनिधी:-***

दुकानातून मोबाईल चोरी केल्याप्रकरणी अज्ञात महिलेविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संपादकीय

## पुन्हा नॅशनल हेराल्ड प्रकरण

नॅशनल हेराल्ड प्रकरण हे भाजपचे माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी यांनी सोनिया गांधी आणि राहुल गांधी, त्यांच्या कंपन्या आणि संबंधित व्यक्तींविरुद्ध दिल्लीतील न्यायालयात दाखल केलेले प्रकरण आहे. मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेटच्या न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) ने इंडियन नॅशनल काँग्रेसकडून ९०. २५ कोटी रुपयांचे व्याजमुक्त कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड करण्यात आली नसल्याचा आरोप आहे. यंग इंडियन नावाची एक कंपनी नोव्हेंबर २०१० मध्ये ५ लाखांच्या भरलेल्या भांडवलासह स्थापन करण्यात आली आणि तिने एजेएलचे जवळजवळ सर्व शेअरहोल्डिंग आणि तिच्या सर्व मालमत्ता (सुमारे ५ हजार कोटी रुपये किमतीच्या) विकत घेतल्या. स्वामींनी सोनिया गांधी आणि राहुल गांधी दोघांनीही गुन्हेगारी गैरव्यवहार केल्याचा आरोप केला होता. या खटल्यात सोनिया गांधी आणि राहुल गांधी हे या प्रकरणात मुख्य आरोपी आहेत. या हाय-प्रोफाइल प्रकरणाची सुनावणी सीबीआयचे विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांच्यासमोर सध्या सुरू आहे. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी असे म्हटले की, गांधी कुटुंबाच्या जवळच्या सहकाऱ्यांना एजेएलचे संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले होते आणि पैसे गुपचूप हस्तांतरित करण्यासाठी फसवे व्यवहार केले गेले होते. या आरोपांमुळे सध्या काँग्रेसमध्ये अस्वस्थता सुरू असल्याचे दिसते. हे प्रकरण नेमके कुठवर पोहोचणार आणि यात काही निष्पन्न होणार का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

अंमलबजावणी संचालनालयाने बुधवारी दिल्लीतील एका न्यायालयात म्हटले की, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राचे प्रकाशक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या २ हजार कोटींच्या मालमत्तेची मालकी केवळ ५० लाख रुपये देऊन मिळवली आहे. यावर अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी म्हटले आहे की, असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडकडे दिल्ली, लखनऊ, भोपाळ, इंदूर, पंचकुला, पाटणा आणि इतर ठिकाणी मालमत्ता आहेत आणि या सर्व मालमत्ता केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारांनी १९४७ नंतर वृत्तपत्र छपाई आणि प्रकाशनासाठी दिल्या आहेत. पण, असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड ताब्यात घेतल्यानंतर लगेचच यंग इंडियन (गांधींच्या नियंत्रणाखालील संस्था) ने घोषित केले की, ते नॅशनल हेराल्डसह कोणत्याही वृत्तपत्र प्रकाशनात सहभागी होणार नाहीत. २००० कोटी रुपयांची संपूर्ण कंपनी ताब्यात घेण्यासाठी त्यांनी फक्त ५० लाख रुपये दिले.

दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाचे विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांच्यासमोर हे निवेदन नुकतेच सादर करण्यात आले आहे. दरम्यान, नॅशनल हेराल्ड मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीच्या फिर्यादी तक्रारीची दखल घ्यावी की नाही, याबाबत न्यायालयात युक्तिवाद सुरू आहे. सुनावणीदरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी असेही म्हटले की, गांधी कुटुंबाच्या जवळच्या सहकाऱ्यांना एजेएलचे संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले होते आणि पैसे वळवण्यासाठी फसवे व्यवहार केले गेले.

नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेसने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला दिलेले ९० कोटींचे कर्ज फक्त ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात यंग इंडियनला हस्तांतरित केल्याचा गंभीर आरोप आहे. या इक्विटी व्यवहारामुळे २००० कोटी रुपयांच्या मालमत्तेचा गैरवापर झाल्याचे ईडीचे म्हणणे आहे. माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी त्यांच्या खाजगी तक्रारीत सोनिया गांधी, राहुल गांधी, मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सुमन दुबे, सॅम पित्रोदा आणि गांधी कुटुंबाच्या नियंत्रणाखालील यंग इंडियनवर फसवणूक, गुन्हेगारी कट रचणे, गुन्हेगारी विश्वासघात आणि मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. ईडीने या वर्षी १५ एप्रिल रोजी गांधी कुटुंबासह पित्रोदा आणि इतरांविरुद्ध खटला दाखल केला आहे.

असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) ही शेअर्सद्वारे मर्यादित असलेली एक अनलिस्टेड पब्लिक कंपनी आहे, ज्याची स्थापना २० नोव्हेंबर १९३७ रोजी झाली आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय हेराल्ड हाऊस, ५-ए, बहादूर शाह जफर मार्ग, नवी दिल्ली येथे आहे. ही कंपनी जवाहरलाल नेहरूंची कल्पना होती, पण ती कधीही त्यांची वैयक्तिक मालमत्ता नव्हती. कारण ती एजेएलचे शेअरहोल्डर बनलेल्या सुमारे ५,००० स्वातंत्र्यसैनिकांच्या पाठिंब्याने सुरू झाली होती. कंपनीचे भांडवल ५ लाख रुपये होते. ३२००० शेअर्समध्ये ही कंपनी विभागली होती. नेहरूंव्यतिरिक्त, एजेएलच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशनवर पुरुषोत्तम दास टंडन , आचार्य नरेंद्र देव , कैलाश नाथ काटजू , रफी अहमद किडवाई , कृष्णा दत्त पालीवाल आणि गोविंद बल्लभ पंत यांसारख्या दिग्गजांनी स्वाक्षरी केली होती. ही कंपनी कोणत्याही विशिष्ट व्यक्तीची नव्हती किंवा बातम्यांव्यतिरिक्त कोणत्याही व्यवसायाशी ती जोडले जाऊ इच्छित नव्हती. कंपनीने रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे दाखल केलेल्या वार्षिक रिटर्ननुसार, २९ सप्टेंबर २०१० पर्यंत एजेएलचे १,०५७ भागधारक होते.


२००८ पर्यंत एजेएलने इंग्रजीमध्ये नॅशनल हेराल्ड , उर्दूमध्ये कौमी आवाज आणि हिंदीमध्ये नवजीवन हे वृत्तपत्र प्रकाशित केले. एजेएलकडे नवी दिल्ली, लखनौ, भोपाळ, मुंबई, इंदूर, पटना आणि पंचकुला यासह विविध शहरांमध्ये रिअल इस्टेट मालमत्ता देखील आहे. एजेएलच्या मालकीच्या रिअल इस्टेटची किंमत ५० अब्ज असल्याचा अंदाज आहे. एजेएलच्या मालमत्तेत हेराल्ड हाऊस ही सहा मजली इमारत आहे, जी सुमारे १०,००० चौरस मीटर ऑफिस स्पेस आहे.२१ जानेवारी २०१६ रोजी एजेएलने लखनौ येथे झालेल्या बैठकीत नॅशनल हेराल्ड आणि त्यांची भगिनी प्रकाशने, क्वामी आवाज आणि नवजीवन ही तीन दैनिके पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला.

दिल्ली उच्च न्यायालयाने सोनिया गांधी आणि इतरांनी ट्रायल कोर्टाने बजावलेल्या समन्सविरुद्ध केलेले अपील फेटाळल्यानंतर, एजेएलच्या अनेक भागधारकांनी आरोप केला की एजेएलने त्यांना कोणत्याही भागधारकांच्या बैठकीसाठी कोणतीही सूचना दिली नव्हती आणि त्यांच्या वडिलांचे शेअर्स एजेएलने डिसेंबर २०१० मध्ये त्यांच्या संमतीशिवाय फसवणूक करून यंग इंडियनला हस्तांतरित केले आहेत. या भागधारकांमध्ये माजी कायदा मंत्री शांती भूषण आणि अलाहाबाद आणि मद्रास उच्च न्यायालयांचे माजी मुख्य न्यायाधीश मार्कंडेय काटजू यांसारख्या प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे.

१३ डिसेंबर २०१० रोजी, राहुल गांधी यांना यंग इंडियनचे संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले तर सोनिया गांधी २२ जानेवारी २०११ रोजी संचालक मंडळात सामील झाल्या. कंपनीच्या ७६ टक्के शेअर्स संयुक्तपणे सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याकडे आहेत आणि उर्वरित २४ टक्के शेअर्स काँग्रेस नेते मोतीलाल व्होरा आणि ऑस्कर फर्नांडिस (प्रत्येकी १२ टक्के) यांच्याकडे आहेत. नॅशनल हेराल्ड प्रकरण या सर्व गोष्टींशी संबंधित आहे.

# दलाई लामा यांच्या अधिकारात चीनचा हस्तक्षेप

**तिबेटी धर्मगुरू १४ वे दलाई लामा (तेन्झिन ग्यात्सो) यांनी त्यांच्या उत्तराधिकारीच्या निवडीबाबत चीनच्या हस्तक्षेपाला ठामपणे विरोध दर्शवला आहे. दलाई लामा यांनी पुन्हा स्पष्ट केले आहे की, त्यांच्या पुनर्जन्माची प्रक्रिया पारंपरिक तिबेटी बौद्ध पद्धतीनेच होणार आहे आणि याचा एकमेव अधिकार गदेन फोड्रंग ट्रस्टकडेच आहे. दलाई लामांनी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, गदेन फोड्रंग ट्रस्टशिवाय कोणालाही माझ्या पुढील पुनर्जन्मात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. त्यांनी ही घोषणा त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या पार्श्वभूमीवर केली असून, चीनच्या या मुद्द्यावर केलेल्या दाव्यांना थेट आव्हान दिले आहे. तिबेटी धर्मगुरू १४ वे दलाई लामा (तेन्झिन ग्यात्सो) यांनी त्यांच्या उत्तराधिकारी निवडीत चीनच्या हस्तक्षेपाला ठाम विरोध केला आहे. त्यामुळे चीन संतप्त झाला आहे.**





अशोक सुतार

कृष्णाकाठ...

दलाई लामांनी २०११ मध्ये घेतलेल्या एका निर्णयाचा पुनःउच्चार करत म्हटले आहे की, पुढील दलाई लामाची निवड गदेन फोड्रंग ट्रस्टच्या नेतृत्वातच होईल. यासाठी तिबेटी बौद्ध परंपरेतील प्रमुख धर्मगुरू आणि धर्मपालक यांचाही सल्ला घेतला जाईल. तसेच त्यांनी १९६९ मध्ये केलेल्या विधानाची आठवण करून दिली की, दलाई लामा संस्था सुरू ठेवायची की नाही, हे निर्णय तिबेटी लोकांवर आणि तिबेटी बौद्ध धर्माच्या अनुयायांवर सोडावे. चीन सरकारने पूर्वीच दावा केला होता की, पुढील दलाई लामाची निवड त्यांनीच केली पाहिजे. चीनच्या या भूमिकेमुळे अनेक वर्षांपासून वाद सुरू आहे. परंतु दलाई लामांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे चीनच्या मनसुब्यांना मोठा झटका बसला आहे.

दलाई लामांनी केलेल्या पुनर्जन्मासंबंधीच्या ताज्या घोषणेमुळे चीन संतप्त आहे, याची अनेक ठोस कारणे आहेत. चीनने गेल्या काही दशकांपासून तिबेटवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी धर्माच्या मुद्द्याचा वापर करण्याचा प्रयत्न केला आहे. दलाई लामांचा पुनर्जन्म जर तिबेटी परंपरेनुसार, चीनबाहेर झाला, तर चीनचा आपला दलाई लामा निवडण्याचा प्लॅन फसतो. त्यामुळे तिबेटवरील राजकीय नियंत्रण गमावण्याची भीती चीनला वाटते.

दलाई लामांनी घोषित केले आहे की, फक्त गदेन फोड्रंग ट्रस्टलाच माझ्या पुनर्जन्माची ओळख पटवण्याचा अधिकार आहे, चीनला नाही. यामुळे चीनने निवडलेल्या 'सरकारी दलाई लामा'ला तिबेटी बौद्ध धर्मगुरूंनी मान्यता न दिल्यास, तो फक्त राजकीय कठपुतळी ठरेल. यामुळे चीनची आंतरराष्ट्रीय प्रतिमा डागाळते. दलाई लामा यांच्या घोषणेमुळे चीनच्या धार्मिक वैधतेवर आव्हान निर्माण होत आहे. भारत, नेपाळ, मंगोलिया, रशिया, जपान, श्रीलंका आदी देशांतील बौद्ध अनुयायांचा पाठींबा दलाई लामा आणि तिबेटी परंपरेला आहे, चीनच्या धार्मिक विचारांना नाही.

दलाई लामांचा पुनर्जन्म भारतात किंवा परदेशात झाला, तर जागतिक बौद्ध नेतृत्व भारताकडे वळण्याची शक्यता आहे, जी गोष्ट चीनला अजिबात मान्य नाही. दलाई लामांनी खुलासा केला आहे की, गेल्या १४ वर्षांत त्यांना तिबेट, निर्वासित तिबेटी समाज, भारत, मंगोलिया, रशिया आणि अगदी चीनमधील बौद्ध अनुयायांकडून शेकडो संदेश आले. या सर्वांनी दलाई लामा संस्थेच्या सातत्याबाबत कळकळीची विनंती केली होती. त्यांच्या भावना लक्षात घेऊन दलाई लामांनी आता स्पष्टपणे सांगितले आहे की, दलाई लामांची परंपरा पुढे सुरू राहील. पण ती कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय, फक्त धार्मिक आणि परंपरेनुसारच होईल. दलाई लामांचे हे निवेदन तिबेटच्या भविष्यावर दूरगामी परिणाम करणारे मानले जात आहे. चीनने वारंवार संकेत दिले आहेत की, ते स्वतःचा दलाई लामा निवडणार आहेत. अशा परिस्थितीत जगाला दोन दलाई लामा दिसू शकतात – एक तिबेटी बौद्ध परंपरेनुसार निवडलेला आणि दुसरा चीनकडून पाठिंबा मिळालेला. या दोन्ही दलाई लामांना जगातील किती बौद्ध राष्ट्रे समर्थन देणार, हा प्रश्नच आहे. विशेषतः भारतासाठी ही एक रणनीतिक कूटनीतिक संधी ठरू शकते, कारण चीनच्या बौद्ध जगतातील पकडीत मोठा तडा जाऊ शकतो.

दलाई लामा ६ जुलै रोजी ९० वर्षांचे होत आहेत. मॅक्लोडगंज, धर्मशाळा येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मध्यवर्ती तिबेटी प्रशासनाचे प्रमुख सिक्योंग पेन्पा त्सेरिंग व इतर मंत्रिगण उपस्थित राहणार आहेत. याच कार्यक्रमात दलाई लामा पुढील उत्तराधिकारीबाबत अधिक तपशील देऊ शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. दलाई लामा यांचे पुनर्जन्म हा तिबेटी बौद्ध धर्मातील एक महत्त्वाचा धार्मिक विश्वास आहे. यानुसार, दलाई लामा हे अवलोकितेश्वर (करुणेचे बोधिसत्व) यांचे मानव रूप मानले जाते आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा आत्मा पुन्हा एका नव्या शरीरात जन्म घेतो. जेव्हा विद्यमान दलाई लामा मृत पावतात, तेव्हा असे मानले जाते की त्यांचा आत्मा दुसऱ्या शरीरात पुनर्जन्म घेतो. वरिष्ठ भिक्षू आणि लामा विशेष ध्यानधारणा, स्वप्ने, पवित्र तलावांतील संकेत, आकाशातील चिन्हे इ. चा अभ्यास करून पुढील दलाई लामाचा जन्म कुठे झाला असेल हे शोधतात.

योग्य बालक आढळल्यास, त्याला पूर्वीच्या दलाई लामांच्या वस्तू इतर वस्तूंमध्ये ठेवून ओळखण्यास सांगतात. जर बालक योग्य वस्तू ओळखतो, तर हे पुनर्जन्माचे महत्त्वाचे लक्षण मानले जाते. योग्य चाचण्या झाल्यावर त्या बालकाला दलाई लामाचा पुनर्जन्म म्हणून मान्यता दिली जाते आणि त्याचे बौद्ध शिक्षण सुरू होते. दलाई लामा म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हे, तर करुणा, शांती आणि अध्यात्म यांचे मूर्तिमंत प्रतीक मानले जाते. प्रत्येक दलाई लामा हा मागील दलाई लामाचा आत्मिक उत्तराधिकारी असतो, असे म्हटले जाते. चीनला दलाई लामा यांच्या विचारांचा अडसर होत आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

# सी.एच.बी. शिक्षकांचा न्याय करणार कोण ?



प्रा.डॉ.सुभाष वाघमारे
सातारा

हा लेख लिहिताना मी खूप अस्वस्थ आहे. माझ्यासाठी नव्हे, तर त्या शिक्षकांसाठी – जे पूर्णवेळ पगार घेणाऱ्या प्राध्यापकांप्रमाणेच काम करतात, पण त्यांना पुरेसा पगार मिळत नाही. शिक्षणाच्या आजच्या व्यवस्थेत एक असा वर्ग आहे, जो शिक्षण देतो, पण स्वतःचे भविष्य मात्र अंधारात ठेवतो. सी.एच.बी. (तासिकेवारी) शिक्षक म्हणजे शिक्षण व्यवस्थेच्या पाया असलेल्या व्यक्ती. ते केवळ शिक्षक नाहीत, तर खरेखुरे सेवाभावी कार्यकारी अधिकारी आहेत. मिटिंग्स होतात, निर्णय घेतले जातात, कामे वाटली जातात – पण ती अधिकाधिक वेळ देऊन पार पाडणारा कोण? तर सी.एच.बी. शिक्षक. सरकारने नियमित प्राध्यापक भरती न केल्यामुळे हे तासिकेवर काम करणारे शिक्षक महाविद्यालयांमध्ये सर्व कामे करताना दिसतात. अध्यापन तर आहेच, पण त्याशिवाय कित्येक समित्यांमध्ये सहभाग, प्रवेशप्रक्रियेत मदत, प्रश्नपत्रिका, मूल्यांकन, परीक्षा, अहवाल लेखन, आणि इतरही सतराशेसाठ जबाबदाऱ्या त्यांच्या खांद्यावर असतात.हा प्रश्न केवळ एका कॉलेजचा किंवा विद्यापीठाचा नाही तर सर्वत्र दिसणारी ही अवस्था आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याने प्रवेशासाठी विनवण्या करणे, गावागावात जाऊन माहिती देणे, याही गोष्टी तेच करतात. कारण विद्यार्थ्यांवरच त्यांच्या नोकरीचे अस्तित्व अवलंबून असते. त्यामुळे कायम प्राध्यापकांपेक्षा अधिक तणाव आणि असुरक्षिततेचा सामना त्यांना करावा लागतो.

वास्तविक पाहता, या शिक्षकांचे जीवन म्हणजे एक मुकबधीर अस्वस्थ संघर्ष आहे. त्यांच्या वाट्याला आलेले नव्हे, तर दिलेले अस्थिरतेचे आयुष्य आहे. २५ वर्षे सेवा दिलेल्या शिक्षकांचेही माणूसपण या व्यवस्थेने जपले आहे का? हा प्रश्न भेडसावतो. अनेक शिक्षक मानसिक आजारांनी ग्रासले गेले आहेत. काहींना आजतागायत स्थिर नोकरी मिळालेली नाही. काहींना लग्नासाठी जोडीदार मिळत नाही, तर काही जण आपल्या शिकवलेल्या विद्यार्थ्यांसोबतच मुलाखतीला जाताना लाज वाटते म्हणून उशिरा जातात. महाविद्यालयीन शिक्षक असूनही खिशात पैसे नसल्याने उसनवारी करून राहावे लागते. मुलांच्या शिक्षणाची फी भरण्याची विवंचना सतत असते. हे शिक्षक केवळ तासिकेवारी काम करतात, पण कामाची व्याप्ती कायम शिक्षकांपेक्षा अधिक असते. नव्हे, काही वेळा तर कायम शिक्षकांच्या बरोबरीने, किंवा त्याही पुढे जाऊन हे सर्व काम पार पाडतात. त्यांना शासकीय सेवक म्हणून कुठलाही हक्क नाही – ना पीएफ, ना विमा, ना आरोग्य सुविधा. आजारी पडले की वेतन बंद. निवृत्तीचं नियोजन तर दूरच.नुसते चहा पिऊन हसून दिवस काढत राहणे कठीण होत आहे...

त्यांनी पीएच.डी. केल्या आहेत, पदव्युत्तर शिक्षण घेतलं आहे, तरीही त्यांच्या कागदपत्रांना फारसे महत्त्व उरत नाही. कधी कधी चांगले काम करूनही ओळखी,जात, पक्षीय नातेसंबंध यामुळे इतरांची कायम नियुक्ती होते.ही नियुक्ती सेवा जेष्ठता डावलून होते. निवड समिती ज्याला गुणवत्ता चांगली म्हणून निवड करतात,त्याच्या पेक्षा कैक पटीने चांगले काम, आणि अधिक सेवा काहींनी दिलेली असते. तरीही हे शिक्षक मूक होऊन बाजूला पडतात. सेवाज्येष्ठता असूनही त्यांना विचारले जात नाही, कारण निवड समितीचा निर्णय अंतिम मानला जातो. त्यांच्यावर न्यायालयातही दाद मागता येत नाही. कारण ते कायम सेवक नाहीत. उन्हाळी आणि दिवाळी सुट्ट्यांचा पगारही नियमित शिक्षकांना मिळतो, पण सी.एच.बी. शिक्षक मात्र तेवढ्याच कामाने सुट्टीतही उपेक्षित राहतात.ही परिस्थिती केवळ अन्यायकारकच नव्हे, तर अमानवी आहे. जे शिक्षक गुणवत्तेने विद्यार्थ्यांचे भविष्य घडवत आहेत, तेच शिक्षक स्वतःच्या जीवनात अस्थिरतेच्या गर्तेत अडकले आहेत. त्यामुळेच काहींना नैराश्य येते, नोकरी सोडावी लागते... आणि दुर्दैवाने काही जण आत्महत्येसारखा टोकाचा मार्गही स्वीकारतात.काहींनी हॉटेल ,काहींनी रिक्षा, काहींनी पारंपरिक व्यवसाय करून पोट भरायचे काम चालू ठेवले आहे. यातही अनुदानित, विना अनुदानित यांचे पगार वेगळे, अपुरे .

शिक्षण मंत्रालय, विद्यापीठ प्रशासन, महाविद्यालये आणि समाज – या सगळ्यांनी याचा गांभीर्याने विचार करायला हवा. सी.एच.बी. शिक्षक म्हणजे शिक्षणव्यवस्थेचा अदृश्य खांब आहे. त्यांना न्याय, सन्मान, स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षा देणे हे आपल्या शिक्षणपद्धतीसाठी अत्यावश्यक आहे.आज जे शिक्षक विविध उपक्रम एनएएसी, सांस्कृतिक कार्यक्रम, अभ्यासमंडळ, सहल, परीक्षा, ऑनलाईन शिक्षण यामध्ये कष्टाने सहभागी होतात – त्यांनाच यथोचित मानधन व स्थिरता नसेल, तर ही शिक्षणव्यवस्था अधिक काळ टिकेल का?सरकारने 'नवीन शैक्षणिक धोरण', 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' असे शब्द वापरताना या शिक्षकांसाठी स्पष्ट, ठोस आणि न्याय्य योजना आणल्या पाहिजेत. विद्यापीठांनी त्यांच्या जबाबदाऱ्या स्वीकारून त्यांना संरक्षण द्यावे, त्यांचा सन्मान राखावा. आज शिक्षण हक्क म्हणणाऱ्या व्यवस्थेने शिक्षकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष केले, तर एक दिवस आपले संपूर्ण शिक्षणपद्धती कोलमडेल आणि त्याचे नुकसान कोणाला होईल? मी आता अधिक जवळ जाऊन सत्य समजून घेत आहे. हा प्रथम लेख केवळ प्रश्नाची ओळख होण्यासाठी आहे. याबाबत मला माहिती देण्याची ,काही पुरावे देण्याची, आणि याबाबत अगोदर घेतल्या गेलेल्या निर्णयाची माहिती कोणास देऊ वाटत असेल तर द्यावी. या प्रश्नावर सखोल विश्लेषण करणे शक्य होईल. तूर्त देशाच्या भविष्यातील पिढीला शिकविणाऱ्या सी.एच.बी. शिक्षकांचा न्याय करणार कोण? हा प्रश्न तुम्ही, आम्ही, आणि प्रत्येक जबाबदार नागरिकाने स्वतःला व व्यवस्थेतील सबंध असलेल्या घटकांना विचारण्याची वेळ आता आलेली आहे.

# रोटरी क्लब ऑफ कराडचा शनिवारी पदग्रहण समारंभ

**कराड/प्रतिनिधी:**

रोटरी क्लब ऑफ कराड ही आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणारी सामाजिक संस्था आपल्या सेवेची ६८ वर्षे पूर्ण करत आहे. रोटरी क्लब कराडचा ६९ वा पदग्रहण समारंभ शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत अर्बन शताब्दी हॉल येथे संपन्न होत आहे. २०२५-२६ या रोटरी वर्षासाठी नूतन प्रेसिडेंट रो. डॉ. शेखर कोगनूळकर (भूलतज्ञ कराड) आणि नूतन सेक्रेटरी विनायक राऊत (प्रिंटिंग व्यावसायिक) पदभार स्वीकारतील. या कार्यक्रमासाठी पद्मश्री मुरलीकांत राजाराम पेटकर (भारताचे पहिले पॅरा ऑलिम्पिक विश्वविक्रमवीर सुवर्ण पदक विजेते व माजी सैनिक) हे प्रमुख पाहुणे म्हणून आणि असिस्टंट गव्हर्नर २०२५-२६ रो. डॉ. नरेंद्र शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडत आहे.

रोटरी क्लब ऑफ कराड आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ कराड सिटी मधील सर्व संचालक मंडळ यांचा देखील पदग्रहण होणार असून त्यासाठी कराड मधील सर्व मानद सदस्य आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रो. डॉ. सविता मोहिते या प्रमुख पाहुणे पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांची प्रकट मुलाखत घेणार आहेत. त्यामध्ये १९७२ मधील पॅरा ऑलिम्पिक मधील सुवर्ण कामगिरी सोबतच जागतिक क्रिडा विश्वावर आपलं वेगळं अस्तित्व निर्माण करणारा जीवन प्रवास ते मुलाखतीच्या माध्यमातून उलगडणार आहेत.

या कार्यक्रमासाठी रोटरी परिवारासोबतच कराडकरांनीही उस्फुर्त प्रतिसाद द्यावा असे आव्हाहन रोटरी क्लब ऑफ कराडचे नूतन प्रेसिडेंट रो डॉ शेखर कोगनुळकर यांनी केले.

# 'नन्हे फरिश्ते'मुळे फुलले हास्य



श्याम ठाणेदार
पुणे

घरात भांडण होणे, गर्दीत हरवणे, पुण्या – मुंबईसारख्या मोठ्या शहराचे आकर्षण या आणि अशा अनेक कारणांमुळे राज्यातील अनेक मुले पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरात दाखल होतात. कुटुंबाशी ताटातूट झालेली ही मुलं पुण्या – मुंबईतील रस्त्यांवर, फुटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॉपवर भटकत असतात. भीक मागून पोटाची खळगी भागवत असतात. यातील काही मुले वाम मार्गाला लागतात तर काही मुले असेच अनाथ म्हणून भटकत असतात. तर काही मुलांना गुंड मवाली जबरदस्तीने भीक मागायला लावतात. त्या मुलांचा गुंड मवाली अतोनात छळ करत असतात. या मुलांना पुन्हा स्वगृही पाठवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने (आर पी एफ) नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली. या मोहिमे अंतर्गत एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील वेगवेगळ्या स्थानकांत रेल्वे संरक्षण दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) २३५ मुलांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही सर्व मुले १२ ते १५ वयोगटातील आहेत. एकट्या पुणे स्थानकात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ५१ मुलांचा शोध घेऊन रेल्वे सुरक्षा दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे शोधलेल्या या मुलांमध्ये पोलीस ठाण्यात नोंद नसलेलीही काही मुले आहेत. ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम रेल्वे सुरक्षा दलाकडून मागील सात वर्षांपासून राबवण्यात येत आहे. २०१८ मध्ये ऑपरेशन नन्हे फरिश्ते या मोहिमेची सुरुवात झाली. आपल्या आई वडिलांपासून ताटातूट झालेली, घरातून निघून पुण्या -मुंबई सारख्या मोठ्या शहरात पळून आलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला मुलींना पुन्हा आपले आई वडील मिळावेत, त्यांना त्यांचे घर पुन्हा मिळावे यासाठी ही मोहीम राबवली जाते. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलीस, रेल्वे कर्मचारी यांच्या समन्वयातून ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली जाते. या मोहिमे अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे डब्यात, रेल्वे स्थानकात किंवा रेल्वेच्या हद्दीत हरवलेल्या किंवा पुण्या – मुंबईत पळून आलेल्या हजारो मुलांची सुटका केली. या मोहिमेमुळे हजारो अल्पवयीन मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून आई वडिलांकडून, कुटुंबापासून दुरावलेली हजारो मुले आपल्या आई वडिलांच्या कुशीत सामावली आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने विशेष आराखडा तयार केला. रेल्वेच्या हद्दीत ज्या ठिकाणी अल्पवयीन मुले मुली भीक मागत आहेत अशी ठिकाणे पोलिसांनी शोधून काढली. या ठिकाणी पोलिसांनी अतिशय गुप्तपणे कारवाई केली. या मुलांना भीक मागायला लावणाऱ्या रॅकेटचा शोध घेतला आणि त्यांना अटक करून हजारो मुलांची सुटका केली. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेऊन या मुलांचे प्रबोधन करण्यात आले. या मुलांच्या पालकांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसांसमोर होते. ते आव्हान पोलिसांनी लीलिया पेलले आहे. ही मोहीम अतिशय स्तुत्य आणि अनुकरणीय अशी आहे. ही मोहीम राबवणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने ही मोहीम राबवून हजारो मुलामुलींना अनाथ होण्यापासून आणि वाम मार्गाला लागण्यापासून वाचवले आहे. ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद द्यावे लागेल. मुंबई पोलीस दलातर्फे देखील 'ऑपरेशन मुस्कान' नावाची अशीच एक मोहीम राबविण्यात येते. या मोहीमे अंतर्गत देखील हजारो मुलामुलींना त्यांच्या पालकांकडे, कुटुंबाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन मुस्कान या सारख्या मोहिमा फक्त पुण्या – मुंबई पुरत्याच मर्यादित न राहता सर्व महानगरात राबवायला हव्यात म्हणजे बेघर झालेली लाखो मुले स्वगृही परततील आणि स्वगृही परतणाऱ्या या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात महाराष्ट्र कृषी दिन उत्साहात साजरा

**सोलापूर/प्रतिनिधी:**



श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित, लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दिनांक १ जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतरावजी नाईक यांची जयंती अर्थात कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्यमंत्री महाराष्ट्राचे हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमा पुजनाने झाली.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे कृषी अर्थशास्त्र विभागाचे विभाप्रमुख प्रा. नवनाथ गोसावी यांनी भूषविले. कृषी दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मौजे आळगे येथील प्रगतशील शेतकरी संगप्पा हत्तुरे हे लाभले होते. यानंतर कार्यक्रम अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा रोप भेट देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. संगाप्पा हत्तुरे पाटील यांच्या हत्तुरे ॲग्रो सायन्स शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत देशी गाईपासून सेंद्रिय खते, जीवामृत आणि तसेच पशुंकरिता पशु खाद्य निर्मिती केली जाते. उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना संगप्पा हत्तुरे यांनी वसंतरावजी नाईक साहेबांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचा उल्लेख केला. आणि त्यांच्याच विचाराला अनुसरून शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत सुरू असणाऱ्या विविध बाबींविषयी सखोल माहिती दिली.

यावेळी त्यांनी कंपनीमार्फत तयार केले जाणाऱ्या सदाबहार जातीच्या पेरू रोपांच्या लागवड पद्धतीविषयी सविस्तर माहिती दिली. या नंतर अध्यक्षीय मनोगतामध्ये प्रा. नवनाथ गोसावी यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री नाईक साहेबांच्या कृषी क्षेत्रातील अतुलनीय कार्याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदरील कार्यक्रमास हत्तुरे ॲग्रो सायन्स शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक दयानंद पाटील, सुरेश कोळी, विनायक जमादार आणि प्रगतशील शेतकरी अंबादास बिराजदार (सेंद्रीय शेती अभ्यासक), मासीद घुटाळे, प्रकाश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी कृषी अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.सुजाता चौगुले आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी कृषी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक – प्राध्यापिका वृंद आणि विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थी प्रतिनिधी कु.गणेश केदार याने केले.

# अनाथ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**सोलापूर/प्रतिनिधी:**



छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच औचित्य साधून अक्कलकोट पुणे रहिवासी संघाच्या वतीने सरस्वती अनाथ शिक्षण आश्रम संस्था दापोडी पुणे येथे अनाथ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात लोकराजा छत्रपती शाहू महाराज व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच संविधानाचे प्रस्ताविकेने करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सागर सोनकांबळे यांनी मांडले. कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या पत्रकार चंद्रशेखर भांगे, पत्रकार नितीन पाठणकर यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश वठार, समाधान दुपारगुडे, दगडू सोनकांबळे, श्रीकांत मडीखांबे, मंजुनाथ वठार, गंगाराम ठोंबरे यांनी घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्कलकोट पुणे रहिवासी संघाचे अध्यक्ष प्रा.राहुल रूहि यांनी केले.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 ✻मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, ✻ सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# वेळेवर कर भरणाऱ्या ग्रामस्थांना बक्षीस वितरण

## तासवडेच्या सरपंच दीपाली जाधव यांच्या मानधनातून बक्षीस; आगळ्या-वेगळ्या उपक्रम



**कराड/प्रतिनिधी : -**
ग्रामविकास आणि लोकसहभाग याला प्रोत्साहन देणारा एक आगळा-वेगळा उपक्रम तासवडे ग्रामपंचायतीत सरपंच सौ. दिपाली अमित जाधव यांच्या पुढाकारातून राबवण्यात आला. त्यांच्या वैयक्तिक सरपंच मानधनातून वेळेवर कर भरून जबाबदार नागरिकत्व निभावणाऱ्या ग्रामस्थांचा सन्मान करण्यासाठी खास लकी ड्रॉ व बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा कराड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (इऊज) मा. प्रताप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी २० भाग्यवान करदात्यांना २० हजार रुपयांची बक्षीसे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमास पंचायत समितीचे अधिकारी माळी, तासवडेच्या सरपंच सौ. दिपाली जाधव, तळबीडच्या सरपंच सौ. मृणालिनी मोहिते, माजी सरपंच संग्राम पवार, उमेश मोहिते, उपसरपंच सौ. मनीषा जाधव, ग्रा.प. सदस्य सुभाष जाधव, सौ. भारती शिंदे, सौ. लता जाधव, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य अमित जाधव, ग्रामसेवक महादेव जाधव, कृष्णा देशमुख व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच हे गावच्या सेवेचे पद असून यामधून गावची सेवा व्हावी, तसेच नवनवीन योजना राबवाव्यात या हेतूने शासनाकडून सरपंचांना मिळणारा पगार स्वतःसाठी न वापरता तो पगार गावच्या विकासासाठी, तसेच विविध योजनांसाठीच वापरण्याचे सरपंच दिपाली जाधव यांनी ठरवले आहे. गावातील ग्रामस्थांनी वेळेवर कर भरला तरच, गावामध्ये मोठ्या प्रमाणावर विकास कामे व योजना राबवण्यात येऊ शकतात. तासवडे गावातील बहुतांशी ग्रामस्थ वेळेवर कर भरत असतात. त्यांना प्रेरणा मिळावी आणि इतर थकबाकीदार यांनाही कर भरणा करण्यास प्रेरणा मिळावी, या हेतूने ३१ मार्च २०२५ अखेरचा संपूर्ण घरफळा, पाणीपट्टी व इतर कर येणे बाकी नसलेल्या सुमारे २७० मिळकतदारामधून हा लकी ड्रॉ काढण्यात आला. तासवडे गावामध्ये नेहमीच नावीन्यपूर्ण व पर्यावरणपूरक उपक्रम राबवले जात असतात.गावला स्मार्ट ग्राम व संत तुकडोजी महाराज ग्राम स्वछता पुरस्कार सुद्धा मागील २ वर्षाला मिळाला असून याद्वारे १३ लक्ष ५० हजार एवढ्या रकमेचे पारितोषिकही मिळाले आहे.

गेल्या ४ वर्षांत विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून १ कोटी ६१ लक्ष रुपयांची कामे पूर्ण झाली असून १५ वित्त आयोग व स्वनिधिमधूनही ५० ते ६० लक्ष रुपयांची विकासकामे झाली आहेत. तासवडे ग्रामपंचायतीने केंद्र शासनाच्या सौर ऊर्जा धोरण व राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या सूचनेला अनुसरून ग्रामविकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलत 'कराड मोटर्स अँड प्रोजेक्ट्स (किर्लोस्कर)' उद्योग समूहाच्या सहकार्याने ३ घथ क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रकल्पामधून दररोज अंदाजे १२ युनिट वीज निर्माण होणार असून महिन्याकाठी सुमारे २,००० रुपयांची वीज बचत ग्रामपंचायतीस होणार आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाचा पारदर्शक आणि विकासाभिमुख दृष्टिकोन या उपक्रमांतून अधोरेखित झाला. सरपंच सौ. दिपाली जाधव यांच्या या सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचे ग्रामस्थांनी संतु कौतुक केले आहे. हा उपक्रम इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.

यावेळी कार्यक्रमास लक्ष्मण जाधव, युवराज जाधव, विकास जाधव, बाळासो जाधव, राजेंद्र जाधव, पांडुरंग शिंदे, संग्राम जाधव, संदीप जाधव, भगवान शिंदे, रामचंद्र जाधव, शंकर जाधव, सुनील जाधव, अभिजीत जाधव, विश्वास जाधव, शहाजी जाधव आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सौर कृषी पंपाच्या समस्या मोबाईलवरून तक्रारीची सुविधा

**मुंबई/प्रतिनिधी:**
राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळविणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळविणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे.

सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नसणे, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाईलवर संदेश मिळेल. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.



# जिल्हा रुग्णालयात डॉक्टर दिन साजरा

**सातारा/प्रतिनिधी:**
१ जुलै डॉक्टर दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सिव्हिल सर्जन डॉक्टर युवराज करपे यांचा व अतिरिक्त सिविल सर्जन डॉक्टर राहुलदेव खाडे व रुग्णालयातील विविध डॉक्टरांचा डॉक्टर दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात यावेळी डॉक्टर युवराज करपे म्हणाले की रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा आहे.

जिल्हा रुग्णालयात सातारा जिल्ह्यातील विविध भागातून रुग्ण येत असतात त्या रुग्णांना रुग्णालयात उत्तम प्रकारे सेवा देण्यात येते. यावेळी बाह्य संपर्क अधिकारी डॉक्टर सुभाष कदम, डॉक्टर विजया जगताप वाई विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र कांबळे, फिजिओथेरपिस्ट पूर्वा कांबळे, सागर भोकरे, नेत्र चिकित्सा अधिकारी विजय निकम, संजय नितनवरे, सुप्रिया भोकरे, व रुग्णालयीन कर्मचारी अधिकारी उपस्थित होते

# ...अखेर, सुनील दळवी यांचे उपोषण मागे

## मसूर ग्रामपंचायत बोगस कर्ज प्रकरण व गैरकारभाराबाबत तात्काळ कारवाईचे पत्र

**मसूर/प्रतिनिधी : -**
मसूर ग्रामपंचायतीचा तिसरा मजला कुठे गायब झाला? शॉपिंग सेंटर गाळ्यांचा लिलावाचे डिपॉझिट करण्याचे ठरले असताना ८५ लाखांची कुठे विल्हेवाट लागली? मसूर ग्रामपंचायतीच्या इमारतीचे बोगस कर्ज प्रकरण यांसह २०१९ चे २०२३ अखेर ग्रामपंचायत कामकाजाबद्दल झालेल्या ऑडिटमध्ये ऑडिटरने गंभीर चुका दर्शवत गैरकारभाराबद्दल ठपका ठेवला आहे. आदी कारणांवरून सामाजिक कार्यकर्ते सुनील दळवी यांनी उपोषण केले होते. आखरे बोगस कर्ज प्रकरण व गैरकारभाराबाबत तात्काळ कारवाईचे पत्र दिल्याने दळवी यांनी उपोषण मागे घेतले आहे.

याप्रकरणी कराड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी यासंदर्भात समिती नेमली असून नियमानुसार तात्काळ कारवाई केली जाईल, असे लेखी आश्वासनाचे पत्र ग्रामविकास अधिकारी बी. डी. मेडेवार यांनी वाचून दाखवल्याने जिल्हा सरचिटणीस नंदकुमार जगदाळे यांच्या हस्ते सरबत घेऊन दळवी यांनी उपोषण मागे घेतले. यावेळी गटविकास अधिकाऱ्यांच्या कडून चर्चेसाठी आलेल्या ग्राम विकास अधिकारी यांच्यावर उपोषणस्थळी विविध प्रश्नांचा भडीमार करण्यात आला त्याचे त्यांना कोणतेही प्रत्युत्तर देता आले नाही.

नंदकुमार जगदाळे म्हणाले, वारंवार मागणी करून दुर्लक्षित करण्यात आलेली ही कारवाई निःपक्षपाती व पारदर्शकपणे झाली नाही तर, आपण लवकरच उग्र स्वरूपाचे आंदोलन करू असा इशाराही जगदाळे यांनी दिला.



मसूर:नंदकुमार जगदाळे यांच्या हस्ते सरबत घेऊन उपोषण सोडताना सुनील दळवी, शेजारी लहूराज जाधव, नरेश माने, जयवंतराव जगदाळे, दिलीप पाटील, सागर जगदाळे आदी मान्यवर.

दरम्यान, उपोषणस्थळी राष्ट्रीय काँग्रेसचे सरचिटणीस नंदकुमार जगदाळे, महानंदाचे माजी संचालक वसंतराव जगदाळे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक लहुराज जाधव, प्रा. कादर पिरजादे, तंटामुक्तीचे अध्यक्ष नरेश माने, ग्राहक राजा संघटनेचे राज्य अध्यक्ष दिलीप पाटील, शरयू कारखान्याचे एमडी विजयराव जगदाळे भाजपचे जयवंतराव जगदाळे, माजी ग्रा.पं. सदस्या पूजा साळुंखे, माजी उपसरपंच सावळाराम कांबळे आदींनी भेट देऊन आपला पाठिंबा दर्शविला.

उपोषण कर्ते सुनील दळवी म्हणाले, दोषींवर कारवाईबाबत एवढा पुरावा असताना अजून कोणता पुरावा हवा आहे, असा सवाल करून हा संगनमताने केलेला गैरव्यवहार असल्याचा संशय येत आहे. ही गंभीर बाब असून या प्रकरणातील सर्व संबंधितांवर कारवाई व्हावी.मात्र, संशयास्पद जुजबी कारवाई झाल्यास संबंधित समितीलाही लक्ष करू वस्तुनिष्ठ कारवाई करून प्रशासन जिवंत आहे की मृत आहे, हेही समितीने ठरवावे, असा प्रश्नही दळवी यांनी व्यक्त केला.

# विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उद्या सायंकाळी अविनाश मडीखांबे यांचा अभिष्टचिंतन सोहळा



**अक्कलकोट/ प्रतिनिधी:**
अक्कलकोट तालुक्यातील अल्पावधीतच गोरगरिबांच्या आणि सर्वसामान्य जनतेच्या मनात घर केलेले आणि सर्व राजकीय पक्ष सामाजिक संघटना नागरिक यांच्या सोबत अत्यंत सलोख्याचे संबंध आणि नाते निर्माण करून सगळ्यांचे आवडते नेतृत्व बनलेले अक्कलकोट तालुक्याचे आर पी आय चे अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या उद्या शुक्रवार दिनांक ४ जुलै २५ रोजी साजरा होणाऱ्या वाढदिवसानिमित अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाला आर पी आय चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या वटवृक्ष देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे मालक रासप चे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील दादा बंडगर तसेच अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या सह सोलापूर जिल्ह्यातील आणि अक्कलकोट तसेच गुलबर्गा विजापुर जिल्ह्यासह इतर ठिकाणचे अनेक ठिकाणचे सर्वपक्षीय मान्यवर उपस्थितीत राहणार आहेत तरी या कार्यक्रमाला तमाम जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन युवा नेते शुभम मडीखांबे आणि लहान भाऊ नागेश मडीखांबे यांनी केले आहे.

अविनाध मडीखांबे यांच्या वाढदिवसानिमित त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने अभिष्ट चिंतन सोहळा आयोजित करण्यात आला असून उद्या शुक्रवार दिनांक ४ जुलै जुलै २५ रोजी अक्कलकोट शहर व तालुक्यात विविध ठिकाणी आणि अनेक गावात तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप मुक बधिर शाळेत मुलाना खाऊ वाटप आणि तालुक्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप आणि वृक्षारोपण विविध क्रीडा स्पर्धा असे कार्यक्रम होणार असून मुख्य कार्यक्रम भीमनगर येथे सायंकाळी ६ वाजता भीमनगर पंच कमिटीच्या समाज मंदिरातील मैदानात होणार आहे या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन शुभम मडीखांबे आणि नागेश मडीखांबे यांनी केले आहेत.

### दैनिक प्रीतिसंगम च्या वतीने महेश गायकवाड यांनी दिल्या शुभेच्छा

आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते आणि आर पी आय चे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या वाढदिवसानिमित दैनिक प्रीतिसंगम चे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी महेश गायकवाड यांनी आज त्यांची भेट घेऊन त्यांना दैनिक प्रीतिसंगम च्या वतीने शुभेच्छा दिल्या.

# पांचगणीच्या श्रुती बेलोशे हिचा यू के पेटंट बनविलेबद्दल गौरव

**पांचगणी/प्रतिनिधी:**
पांचगणी येथील कन्या आणि स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर बारामतीची विद्यार्थिनी कु. श्रुती उत्तम बेलोशे हिचा आणि तिच्या टीमचा यू के पेटंट बनवल्याबद्दल प्रसिद्ध शास्त्रद्न अनिल काकोडकर यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, देशाचे नेते शरदचंद्र जी पवार साहेब,एग्रीकल्चर ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार आदी उपस्थित होते.

बारामती सायन्स सेंटरच्या कृषी विज्ञान केंद्रात (Agricultural Science Center of Baramati Science Center) टेक्नॉलॉजी डेमोन्स्ट्रेशन प्रोजेक्टच्या (Technology Demonstration Project) उद्घाटनाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. यावेळी हा सन्मान सोहळा पार पडला.

स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर बारामती च्या डी फार्मसीच्या तिसऱ्या वर्षातील विद्यार्थी श्रुती बेलोशे, हर्षल पोटाळे, रूपेश काशिद, सानिका पिसाळ , जाई इंगळे या



विद्यार्थ्यांनी बनविलेल्या यू के पेटंट (मॉड्यूलर रोडेंट मेझ उपकरण) चा यावेळी सन्मान करण्यात आला. या टीमला यावेळी सर्टिफिकेट व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या यशाबद्दल कु. श्रुती बेलोशे हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# निळकंठ जंगम (स्वामी) यांचे निधन



**पाटण/प्रतिनिधी : -**
वीरशैव समाजाचे जेष्ठ मार्गदर्शक निळकंठ बाळलिंग जंगम (स्वामी) यांचे सोमवार, दि. ३० रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले.

परंपरागत विविध धार्मिक विधी, कार्यांच्या निमित्ताने त्यांचे शहरासह परिसरातील ग्रामीण भागातील सर्व स्तरातील समाजघटकांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. येथील राजेंद्र स्वामी, महेश स्वामी, विक्रम स्वामी यांचे ते पिताश्री होत. रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुले, सुना, नातवंडे, दोन भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे.

# हेळगावच्या सुकन्येची पीएचडीला गवसणी

## पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात श्वेता सूर्यवंशी पाटीलचे यश



**मसूर/प्रतिनिधी:**
शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी असे संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील एका अभंगाची सुरुवात आहे. याचाच प्रत्यय देत कराड तालुक्यातील हेळगाव येथील माहेरवाशिण असलेली सेवानिवृत्त उपप्राचार्य सयाजीराव सूर्यवंशी यांची कन्या श्वेता सूर्यवंशी सध्याची सौ श्वेता विनायक पाटील यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे पीएचडी मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. त्यांनी मॉडुठर डेव्हलपमेंट ऑफ कन्वेंशनल वेईकल इनटू इलेक्ट्रिकल व्हेईकल या विषयावरती संशोधन केले होते. पीएचडी साठी या विषयावरती त्यांनी सहा शोधनिबंध सादर केले होते.. त्यांना सिरो संशोधन संस्थेमार्फत ९ लाख रुपयांची शिष्यवृत्तीही मिळाली होती.

सौ श्वेता यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उंब्रज येथील महात्मा गांधी विद्यालयात झाले आहे. अभियांत्रिकी शिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड येथून यंत्र विभागात पूर्ण केले आहे सध्या पिंपरी चिंचवड येथील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग निगडी पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक या पदावर त्या कार्यरत आहेत.

त्यांच्या या यशामध्ये त्यांच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे असे आवर्जून नमूद करतात. त्यांचे आई-वडील, पती, मुले ,भावंडे, आणि सासरच्या कुटुंबाचा खूप मोठा पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. हेळगाव येथील माजी ग्रामपंचायत सदस्य कौस्तुभ सूर्यवंशी यांच्या त्या भगिनी होत तर इस्लामपूरचे सेवानिवृत्त उपप्राचार्य एम.जी. पाटील यांच्या ज्येष्ठ स्नुषा होत.

### सातत्य आणि परिश्रम आवश्यक..

कोणत्याही उच्च पदापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य मार्गदर्शन गरजेचे असतेच. दोन्ही कुटुंबे उच्चशिक्षित असल्याने मला पीएचडी मिळवताना त्याचा खूप मोठा फायदा झाला मला योग्य ते मार्गदर्शन माझ्या माहेर आणि सासरच्या कुटुंबाकडून मिळाले. तसेच सातत्य आणि परिश्रमाच्या जोरावरच आपण हे संपादन केले असल्याचे श्वेता पाटील यांनी सांगितले.

### पीएचडी मिळवणारी पहिली सुकन्या

कराड तालुक्यातील हेळगाव येथील अनेक विद्यार्थ्यांनी मोठ-मोठे यश संपादन करून उच्च पदापर्यंत मजल मारली आहे. मात्र पीएचडी मिळवणारी श्वेता पाटील ही हेळगावची पहिली सुकन्या ठरली आहे. तिच्या यशामुळे हेळगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



# विश्वास निकम यांना ग्रंथ सेवा पुरस्कार प्रदान

**कराड/प्रतिनिधी:**
अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्ष सेना महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेचा राज्यस्तरीय स्वाभिमानी आदर्श ग्रंथ सेवा पुरस्कार सुखशांती सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय नांदलापूर चे संस्थापक अध्यक्ष विश्वास निकम यांना आंतरराष्ट्रीय व्यंगचित्रकार अशोक सुतार डॉ.कल्पना चावला विज्ञान केंद्राचे संचालक डॉ.संजय पुजारी व अखिल भारतीय मराठा साहित्य परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विक्रम शिंदे यांच्या हस्ते यशवंतरावजी चव्हाण स्मृति सदन टाऊन हॉल कराड येथे प्रदान करण्यात आला.

यावेळी अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष पिलाजी थोरवडे,साहित्यिक सत्यवान मंडलिक,कराड न्यूज चे संपादक दशरथ पवार इत्यादी मान्यवरांनी उपदेश पर मार्गदर्शन केले.विश्वास निकम यांनी हा पुरस्कार मिळाल्याबद्दल थोरवडे साहेबांचे आभार मानले.या पुरस्काराने समाजामध्ये वाचन संस्कृती अधिक जोमाने रुजवण्यासाठी प्रेरणा मिळाली असून हा पुरस्कार मी नांदलापूर नगरीचे वाचक सभासद व तमाम नागरिकांना समर्पित करत असून यापुढे ही मी ग्रंथ सेवेचे कार्य चांगल्या पद्धतीने पार पाडण्याचा प्रयत्न करीन.कार्यक्रमास जागतिक विक्रमवीर गिर्यारोहक अन्वी घाडगे, दत्तात्रय कुंभार सोमनाथ पागर व

पुरस्कार प्राप्त सन्माननीय व्यक्ती उपस्थित होते. यावेळी सत्यवान मंडलिक,पिराजी थोरवडे यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष डांगे यांनी केले तर आभार किरण थोरवडे यांनी मानले.

# माजी सभापती मल्लू पाटील यांच्यावर अखेर गुन्हा दाखल

**प्रीतिसंगम इफेक्ट**

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**
दैनिक प्रीतिसंगम ने मंगळवार दिनांक १जुलै रोजी च्या अंकात माजी सभापती मल्लू पाटील यांना अटक करावी अशी मागणी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावे अशा आशयाची करणारे भीमशक्ती सामाजिक संघटनेने केलेल्या तक्रारीची बातमी प्रकाशित केली होती या बातमीचा मोठा इफेक्ट झाला असून बातमी प्रकाशित होताच अक्कलकोट तालुक्यातील जेऊर गावचे रहिवासी आणि माजी सभापती मल्लू पाटील यांच्यावर अखेर सोलापुरात गुन्हा दाखल झाला आहे

याबाबत चे सविस्तर वृत्त असे की, अक्कलकोट येथील काँग्रेस अध्यक्ष असलेले मल्लू पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात स्टंटबाजी करत शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या कार्यालयाला सोमवारी टाळे लावून कामकाज बंद पाडून कर्मचाऱ्यांना कार्यालया बाहेर काढले होते.

यामुळे आज त्यांच्यावर विविध कलमाखाली सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मल्लिकार्जुन पाटील यांच्या अक्कलकोट तालुक्यात विविध ठिकाणी असंख्य शिक्षण संस्था आहेत. एका संस्थेतील शिक्षक नियुक्तीचे प्रस्ताव त्यांनी माध्यमिक शिक्षण विभागात दाखल केले आहेत. बऱ्याच दिवसापासून हे प्रस्ताव प्रलंबित असल्याने ते हेलपाटे मारीत आहेत. हे काम व्हावे म्हणून त्यांनी ही स्टंटबाजी केल्याची चर्चा आहे. पण गुन्हा दाखल झाल्यामुळे ही स्टंटबाजी अंगलट आल्याचे आता बोलले जात आहे.

सोलापूर: जिल्हा परिषदेत येऊन स्टंटबाजी करणे अक्कलकोट त काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांना महागात पडले आहे. सरकारी कामात अडथळा आणला म्हणून पाटील यांच्या विरोधात सदर बजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी माध्यमिक शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मल्लिकार्जुन पाटील (राहणार जेऊर, तालुका अक्कलकोट) यांच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० जुलै रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास माध्यमिक शिक्षण विभागात जाऊन पाटील यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना कामकाज करू दिले नाही व शासकीय कामात अडथळा केला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास सपोनी कुलकर्णी करीत आहेत.

३० जुलै रोजी अक्कलकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील हे जिल्हा परिषदेत आले होते. माध्यमिक शिक्षण विभागाच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या कार्यालयात ते गेले. त्यावेळी शिक्षणाधिकारी जगताप हे कार्यालयात नव्हते. उपस्थित कर्मचारी व कामासाठी आलेल्या लोकांसमवेत त्यांनी आरडाओरडा करून शिक्षणाधिकारी फोन उचलत नाहीत, संस्थेची कामे करीत नाहीत म्हणून कार्यालय बंद करून कुलूप लावण्याचा प्रयत्न केला. ही माहिती मिळताच शिक्षणाधिकारी जगताप तेथे आले. त्यावेळी पाटील यांनी आरडाओरडा करून त्यांना काम करू दिले नाही.

दादागिरी करणाऱ्या माजी सभापती मलू पाटील याला अटक करावे अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे भीमशक्ती सामाजिक संघटनेने केली होती

दादागिरी करणाऱ्या आणि कायदा हातात घेणाऱ्या अक्कलकोट जेऊर गावच्या मलू पाटील यांना तत्काळ अटक करून कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे राज्य सचिव संजय रणदिवे यांनी शिक्षणमंत्री यांच्याकडे तक्रार देऊन केली होती. माजी सभापती राहिलेल्या आणि सद्या कोणतेही लोकप्रतिनिधी चे पद नसलेल्या मलू पाटील यांनी शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या कार्यालयाला कुलूप लावून कायदा हातात घेतला आहेत आणि त्यांनी सरकारी कामात अडथळा आणला आहे त्यामुळे त्यांना तत्काळ अटक करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

माध्यमिक शिक्षण कार्यालयाला मलू पाटील यांनी कुलूप घालून सरकारी कामकाज रोखून धरले होते. बेकायदेशीर भरती करून त्यांनी शिक्षक मान्यता द्यावी म्हणून असे कृत्य केले असावे असेही संजय रणदिवे यांनी तक्रारी मध्ये म्हटले होते . सोमवार दिनांक ३० जुन २०२५

माजी सभापती मलू पाटील हे माध्यमिक शिक्षण कार्यालयाला घुसले आणि त्यांनी कायदा हातात घेऊन कार्यालयास कुलूप लावून शिक्षणाधिकारी यांचे कामकाज बंद पाडले होते. ही बाब अतिशय गंभीर ठरली होती.

सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील हे जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागाच्या कारभारावर दबाव आणून बेकायदेशीर कामे करून घेण्यासाठी शिक्षणाधिकारी यांना वेठीस धरून त्यांची बदनामी करत आहेत



इतकेच नाही तर सुपर क्लास वन अधिकारी असलेल्या अधिकाऱ्यांना फेर भांडण काढून कार्यालयात गोंधळ घालून कायदा हातात घेऊन शांतता भंग करून. सरकारी कामकाज बंद पाडले आहेत. माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्यांना आपल्या कार्यालयास कुलूप घातले असल्याचे समजल्यावर ते कार्यालयात तातडीने आले असता मल्लिकार्जुन पाटील यांनी शिक्षणाधिकारी यांना तू तू मैं मैं करून भांडण करून त्यांच्याशी हुज्जत घातली आहे.

यावेळी त्यांनी शिक्षणाधिकारी यांना शिक्षणाधिकारी जगताप यांनी अरेरावीची भाषा वापरून दमदाटीही केल्याचे कळते.

# ऊस उत्पादन वाढीसाठी पंचसुत्रीचा वापर करणे आवश्यक

## संजीव माने; जयवंतराव भोसले कृष्णा कृषी महाविद्यालयात कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण व वृक्षदिंडी

**कराड/प्रतिनिधी : -**

जमिनीची सुपिकता, ऊस लागणीची योग्य पद्धत, रासायनिक खतांची मात्रा, पाणी व्यवस्थापन आणि पिकसंरक्षण या पंचसुत्रीचा वापर एकरी उस उत्पादन वाढीसाठी करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन कृषीभूषण संजीव माने यांनी केले.

य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखाना संचलित जयवंतराव भोसले कृष्णा कृषी महाविद्यालयात स्व.वसंतराव नाईक जयंती व महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण, वृक्षदिंडी कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक बाबासो शिंदे होते.

कार्यक्रमास संचालक बाजीराव निकम, शिवाजी पाटील, जे डी.मोरे, विलास भंडारे, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, कृष्णा विश्व विद्यापीठाचे उपकुलसचिव एस.ए. माशाळकर, आंतरराष्ट्र व्यवहार विभागाच्या उपसंचालिका अर्चना कौलगेकर, बहेचे माजी उपसरपंच मनोज पाटील, प्राचार्य डॉ. अशोक फरांदे, जयवंतराव साळुंखे, माजी पंचायत समिती सदस्य सुनील पोळ, जनरल मॅनेजर (केन) दादासाहेब शेळके, ऊसविकास अधिकारी पंकज पाटील आदी उपस्थित होते.

संजीव माने पुढे म्हणाले, ऊस शेतीकडे शाश्वत पिक आहे. जमिनीची सुपिकता हा ऊस शेतीमध्ये महत्त्वपूर्ण आहे. सेंद्रीय कर्ब कमी होत असतांना शेण खत, हिरवळीचे खते, गांडूळ खताचा वापर करून सेंद्रीय कर्ब वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. लागवडी पूर्वी माती परिक्षणनुसार खतांचा वापर, योग्य प्रमाणात शेण खत अथवा इतर सेंद्रीय खतांची मात्रा देत असतांना मुख्य, दुय्यम सुक्ष्म आणि सुक्ष्म अन्नद्रव्याचा वापर करावा. जास्त रासायनिक खते जास्त उत्पादन हा लोकांचा गैरसमज आहे. शास्त्रोक्त पद्धतीने ऊस शेती केल्यास एकरी १०० ते १२५ टन ऊस उत्पादन सहज शक्य असल्याचे कृषिभूषण संजीव माने यांनी सांगितले.



कॅप्शन : रेठरे बुद्रुक : जयवंतराव भोसले कृष्णा कृषी महाविद्यालयात कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण करताना कृषिभूषण संजीव माने, संचालक बाबासो शिंदे व इतर मान्यवर.

ऊस उत्पादनामध्ये सरीला अत्यंत महत्त्व आहे. मध्यम आणि हलक्या जमिनीमध्ये साडेचार फूट, काळ्या जमिनीमध्ये पाच फूट तर भारी जमिनीमध्ये सहा फूट सरीचा अवलंब करताना उसाला सूर्यप्रकाश कसा मिळेल, यावर भर देण्याची गरज असल्याचे माने यांनी सांगितले.

मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार म्हणाले, कृष्णा कारखाना चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या ऊस उत्पादन वाढीसाठी फ्लिड स्टाफ आपल्या दारी उपक्रम राबवित आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपल्या कारखान्याच्या माध्यमातून कृषी महाविद्यालयातून शेतीचे शिक्षण देण्यात येते. या महाविद्यालयात शिकलेल्या विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे गाठली आहेत. ते विद्यार्थी ग्रामीण भागाशी नाळ जुळवून आहेत.

संचालक बाबासो शिंदे यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमात प्रगतशील शेतकरी मोहन निकम (शेरे), अजय मोहिते (रेठरे बुद्रुक), संचालक जे. डी.मोरे (रेठरे हरणाक्ष), तानाजी माळी (रेठरे हरणाक्ष) या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी विद्यार्थ्यांनी कृषिचे महत्व सांगणारे पथनाट्य सादर केले. कॉलेजचे प्राचार्य डॉ.अशोक फरांदे यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. अमोल मंडले यांनी केले. प्रा. डॉ.सारंग कुंभार यांनी आभार मानले.

# पोदारमध्ये 'ॲडडफ्लुएंस - अ मीडिया एक्स्ट्रावर्गेजा' उपक्रमाचे आयोजन

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'ॲडडफ्लुएंस – अ मीडिया एक्स्ट्रावर्गेजा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेमध्ये सुमारे महिनाभर सुरू असलेल्या इंटिग्रेटेड इंग्लिश या विषयांतर्गत 'मीडिया अनमास्कड' या उपक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घोटन मराठी दिग्दर्शक गुरुदास उर्फ प्रवीण तानाजी पाटील यांच्या हस्ते झाले.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या माध्यमांचे विश्लेषण, त्यातील प्रभाव, जाहिरातींचा परिणाम, तसेच समाजावर होणारा परिणाम यावर सखोल विचार मांडले. पोस्टर, रोल प्ले, प्रेझेंटेशन आणि लघुनाटिका अशा सर्जनशील पद्धतींनी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली.

शाळेच्या उपप्राचार्या सौ. स्वाती नांगरे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रवीण तानाजी पाटील म्हणाले, इतक्या लहान वयात मुलं केवळ जाहिरात कशी काम करते, हे समजून घेत नाहीयेत; तर त्यामागील उद्दे श, तंत्र आणि प्रभाव देखील विश्लेषित करत आहेत. हेच खरं शिक्षण आहे, जे फक्त पुस्तकी मर्यादांमध्ये न राहता वास्तवाशी जोडलेलं आहे.



शाळेचे प्राचार्य अन्वय चिकाटे म्हणाले, जाहिराती केवळ उत्पादन विकण्यासाठी नसून, त्या विचार, भावना आणि मूल्ये सुद्धा प्रभावीपणे पोहोचवतात. विद्यार्थ्यांनी जाहिरातींकडे केवळ आकर्षण म्हणून न पाहता, त्यामागील उद्दिष्ट, भाषा, आणि प्रभाव याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. यामुळे त्यांची विचारशक्ती वाढते आणि ते सजग ग्राहक व समजूतदार नागरिक बनतात.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे प्राचार्य अन्वय चिकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्या सौ. स्वाती नांगरे, शाळेचे प्रशासकीय व्यवस्थापक विशाल जाधव, कार्यक्रमाच्या समन्वयिका सौ. मेघा पवार, इंटिग्रेटेड इंग्लिशच्या समन्वयिका सौ. सीमा शेळके, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, सृजनशीलता आणि माध्यमांची जाण निर्माण झाली असून पालक व शिक्षकांकडून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

# शेतशिवारात शिक्षणाची पेरणी

# पणदरे गावात कृषिदुतांचे प्रेरणादायी आगमन!

**बारामती/प्रतिनिधी: -**

पुस्तकं एकीकडे...आणि मातीत नांगर टाकणारे हात दुसरीकडे! – बारामती येथील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात उतरून 'ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२५–२६' ला पणदरे गावात दमदार सुरुवात केली आहे.

पणदरे– ॲग्रीकलचरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय बारामती येथील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ५ जून २०२५ रोजी पणदरे या गावामध्ये ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमासाठी आगमन झाले आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय बारामती ह्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांनुसार सात आठवडे चालणारा हा ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम आहे.

या उपक्रमाची आखणी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि वास्तवाशी समरस होणारी आहे. शहरातील पुस्तकी शिक्षणाला ग्रामीण वास्तवाची जोड देत, विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांच्या आयुष्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संस्थेचे चेअरमन राजेंद्र दादा पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलावडे, प्राचार्या जया तिवारी, कार्यक्रम अधिकारी डॉ. मयूर पिसाळ, प्रा. पल्लवी कोळेकर, प्रा.शिवानी कोकरे देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबवला जात आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे शिक्षण आणि प्रत्यक्ष शेती यामधील दरी कमी होऊन ज्ञानाच्या नव्या वाटा खुल्या होत आहेत.

विद्यार्थ्यांचे पणदरे गावातील आगमन हे केवळ एक औपचारिक भेट नव्हे, तर गावाच्या सामाजिक व शेती व्यवस्थेत सहभागी होण्याच्या एका नवीन पर्वाची सुरुवात ठरली. या दरम्यान विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाला भेट दिली आणि तेथील स्थानिक प्रशासनासोबत सुसंवाद साधला. सरपंच अजय सोनवणे, उपसरपंच प्रवीण कोकरे, तसेच के.बी.कोकरे, जे.पी.जगताप, मनोज पवार, विवेक जगताप, संजय जगताप, यशवंत कोकरे, अमोल लोखंडे, जय कोकरे, शरद कोकरे, शिवाजी लोणकर आणि इतर शेतकऱ्यांनी या कृषिदुतांचे मन:पूर्वक स्वागत केले. हे स्वागत केवळ पारंपरिक आदरातिथ्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते ग्रामीण आणि शैक्षणिक पातळीवर एक सशक्त नातं उभं राहिल्याचे प्रतीक ठरले.

कृषीदुत रिद्धीश पाटील, अनिकेत लकडे, वेद चौधरी, अमित नवले, तेजस शितोळे, अनुराग क्षीरसागर, शिवम जगताप, सुधांशु कुमावत, मुकुंद शेजवळ आणि हर्षद गरुड या युवकांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत 'ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२५-२६' यासंदर्भात माहिती दिली. केवळ बोलण्यापुरते नव्हे तर ही माहिती शेतकऱ्यांच्या गरजांशी जोडलेली होती. यामध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या विविध प्रात्यक्षिकांची माहिती, कृषी व्यवस्थापनातील सध्याच्या गरजा, आणि त्यावर उपाययोजना यांचा समावेश होता.

पुढील सात आठवडे हे विद्यार्थी गावामध्ये वास्तव्यास राहून प्रत्यक्ष शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनपद्धतीचा सखोल अभ्यास करणार आहेत. त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणे, पीक पद्धतींचा अभ्यास करणे, त्यांचे सामाजिक–आर्थिक जीवनमान तपासणे, आणि त्यात सुधारणा सुचवणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या काळात सेंद्रिय शेती, पाणी व्यवस्थापन, कीड नियंत्रण, माती परीक्षण अशा अनेक बाबींवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकं घेऊन शेतकऱ्यांना नवे मार्गदर्शन दिले जाणार आहे.

या कृषिदूतांचा गावातील वावर म्हणजे केवळ शिक्षणाचाच भाग नाही, तर हा एक सामाजिक परिवर्तनाचा प्रयोग आहे. शिक्षणाने मातीत पाय रोवले, तर समाजाच्या मुळांनाच नवी उभारी मिळते, हे या उपक्रमातून सिद्ध होत आहे. ग्रामीण भारताच्या विकासासाठी अशी कृतीशील आणि वास्तववादी शिक्षणपद्धती काळाची गरज ठरते आहे. आणि पणदरे गावात या उपक्रमाच्या निमित्ताने हे बदल घडताना पाहणं म्हणजेच खरं सकारात्मक भविष्य!

# नॅशनल स्पीड मॅथ परीक्षेत रघुकुल विद्यालयाचा सार्थक वाकळे राज्यात प्रथम

**मल्हारपेठ/ प्रतिनिधी:**

पाटण तालुक्यातील नाडे येथील रघुकुल बाल मंदिर व प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता सातवीचा विद्यार्थी सार्थक सुहास वाकळे यांने नॅशनल स्पीड मॅथ परीक्षेत १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला तर श्रीराज माने, संग्राम पाटील, अनमोल कदम, प्रणव पानसकर यांनी देखील १०० पैकी प्रत्येकी ९८ गुण मिळवून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. त्याचबरोबर इयत्ता सहावीचे विद्यार्थी मानसी पल्ले, आदित्य लोहार यांनी प्रत्येकी ९८ गुण मिळून राज्यात दुसरा, श्रेयश पिसाळ, वरदा चव्हाण यांनी ९६ गुण मिळवून राज्यात तिसरा क्रमांक मिळवला. त्याचबरोबर याच शाळेचे अनेक विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरावर देखील यश मिळवलेले आहेत.

स्मार्ट ब्रेन एज्युकेशन पुणे यांच्यावतीने नाडे येथील रघुकुल बालमंदिर व प्राथमिक विद्यालय येथे नॅशनल स्पीड मॅथ एक्झाम २०२५ आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेसाठी पाटण तालुक्यातील दोन शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या परीक्षेत पाटण तालुक्यातील नाडे येथील रघुकुल बाल मंदिर व प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता सातवीच्या सहा विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर तर दोन विद्यार्थ्यांनी केंद्र स्तरावर यश प्राप्त केले. त्याचबरोबर इयत्ता सहावीच्या चार विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर व पाच विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरावर यश प्राप्त केले.



नॅशनल स्पीड मॅथ परीक्षेत यश प्राप्त केलेले रघुकुल विद्यालयाचे विद्यार्थी

विद्यालयाचे यशस्वी विद्यार्थी व त्यांना प्राप्त झालेले १०० पैकी गुण पुढील प्रमाणे आहेत. राज्य स्तरावर इयत्ता सातवी मधून सार्थक सुहास वाकळे (१००), श्रीराज सचिन माने (९८), संग्राम सुनील शिंदे (९८), अनमोल भरत कदम (९८), प्रणव तात्यासो पानस्कर (९८), तन्मय किशोर चव्हाण (९६), त्याचबरोबर केंद्रस्तरावर अन्वी विकास सगरे (९०), समर्थ संभाजी पवार (९०)यांनी घवघवीत यश प्राप्त केले.

इयत्ता सहावीमधून राज्यस्तरावर मानसी मिथुन फल्ले (९८), आदित्य राहुल लोहार (९८), श्रेयश सतीश पिसाळ (९६) यांनी राज्यात दुसरा वरदा जयवंत चव्हाण (९६) हिने तिसरा क्रमांक मिळवला, तसेच केंद्रस्तरावर आर्या पांडुरंग शिरवाडकर (९०), प्रांजल विक्रम पानसकर (९०), आराध्या राहुल देसाई (९०), स्वरांजली विशाल यलमार (८४), शुभ्रा जयसिंग चव्हाण (८२), या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले.

या यशाबद्दल त्यांचे सुयश मेडिकल अँड चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विजय देसाई सचिव डॉ. सौ. रुपाली देसाई, खजिनदार सुधाकर देसाई, संचालक सुधाकर पवार, विक्रम देसाई, जगन्नाथ लोहार, विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सविता नलवडे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शुभांगी नलवडे, सर्व शिक्षक वृंद पालक वर्ग यांनी अभिनंदन केले.

# विठामाता विद्यालयात आ.स्व.पी.डी. पाटील साहेब यांची जयंती उत्साहात साजरी

**कराड/प्रतिनिधी:**

श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, कराड संचलित विठामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कराड, याठिकाणी आ. स्व. पी. डी. पाटील साहेब यांची १०८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या, विठामाता विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका, सौ. मुल्ला एस. ए. मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या विठामाता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, डॉ. सौ. विश्रांती देसाई मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमात इयत्ता नववी ब च्या विद्यार्थिनी अनन्या जंगम, श्रुती पवार, श्रावणी पाटील, अर्पिता झिमरे यांनी आ.स्व.पी.डी. पाटील साहेबांच्या जीवनावर आधारित भित्तीपत्रक आणि विठाई अंक तयार केले. त्याचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांनी व अध्यक्षांनी केले. तसेच वैष्णवी सावंत व प्रशिका आंबवडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या, सौ.मुल्ला मॅडमनी आपल्या मनोगतातून आ.स्व.पी.डी. पाटील साहेबांचा जीवनपट उलगडून सांगितला. शिवाजी शिक्षण संस्थेमार्फत शाळेतील गरजू विद्यार्थिनींना गणवेश वाटप व वह्यांचे वितरण करण्यात आले.

तसेच जयंतीनिमित्त शाळेमध्ये हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्र वितरण करण्यात आले. यावेळी विठामाता विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका सौ. मनीषा उनउने मॅडम, पर्यवेक्षिका सौ. वैशाली चव्हाण, कार्याध्यक्षा सौ. आत्तार मॅडम, उपकार्याध्यक्षा सौ. उनउने मॅडम यादेखील उपस्थित होत्या. हा कार्यक्रम इयत्ता नववी ब च्या विद्यार्थिनींनी पार पाडला त्यासाठी त्यांना वर्गशिक्षिका सौ दिपाली पाटील यांनी मार्गदर्शन केले. उपस्थितांचे आभार दिपाली वाघ मॅडम यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली पानस्कर मॅडम यांनी केले. यावेळी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# महाराष्ट्र हायस्कूलमध्ये पी.डी.पाटील जयंती साजरी

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील महाराष्ट्र हायस्कूलमध्ये स्वर्गीय पी. डी. पाटीलसाहेब यांची जयंती साजरी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एन. आर. पवार यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

एन. आर. पवार म्हणाले, पी. डी. पाटीलसाहेब यांनी कराड नगरपरिषदेचे ४३ वर्ष बिनविरोध नगराध्यक्ष पद भूषवले. त्यांचे नाव ग्रीनिज बुकामध्ये लिहिले गेले आहे. कराडनगरीचा विकास व सह्याद्री साखर कारखाना स्थापना आणि त्याचा कार्यकाल गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची गंगा कशी उदयास आली.

विद्यालयाचे मुख्याध्यापक लादे सर यांनी पी. डी. पाटीलसाहेबांचे घराणे आणि त्यांच्या घराण्याची असणारा जवळचा संबंध व्यक्त केला. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना जयंतीनिमित्त वह्याचं वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस. बी. शिंदे यांनी केले. पी. डी. पाटीलसाहेब यांच्याविषयी विद्यालयातील विद्यार्थी अनुष्का थोरात, ऋतुजा कचरे, वैष्णवी मांजरे व विद्यालयातील शिक्षक एन. जे. खाडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यालयातील माळी सर, भुलून सर, सूर्यवंशी सर, सौ. कुलकर्णी मॅडम, तसेच सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन शशिकांत शिंदे, आर. के. ठाकरे यांनी आभार मानले.



यशवंतनगर : आदरणीय पी. डी. पाटील आणि वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना कारखान्याचे सभासद, अधिकारी व कर्मचारी.

# सह्याद्री कारखान्यावर आदरणीय पी.डी. पाटीलसाहेब व वसंतराव नाईक यांना आदरांजली

**कराड/प्रतिनिधी : -**

सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक आदरणीय पी. डी. पाटील साहेब आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री आदरणीय वसंतराव नाईक यांच्या जयंती दिनानिमित्त सह्याद्री सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर त्यांच्या प्रतिमेस कारखान्याचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी त्यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली आणि त्यांच्या विचारावर मार्गक्रमण करून आपण आपल्या कारखान्यास अग्रेसर ठेवावे हीच त्यांना आदरांजली ठरेल, असे सांगितले. याप्रसंगी कारखान्याचे सभासद अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकाम करणाऱ्या बाईने ...

पान १ वरुन

चोरल्याचे कबूल केले पोलिसांनी काही दागिने घरातून हस्तगत केले तर काही दागिने सोनाराकडे तिने गहाण ठेवल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले .सदर महिलेवर यापूर्वीही अन्य एका गुन्ह्यामध्ये चोरीचा गुन्हा दाखल झालेला आहे.या तपासात पोलिस अंमलदार सुरेश घोडके , मनोज मदने, निलेश काटकर, ज्योतीराम पवार, महेश बनकर, अभय साबळे, सचिन पवार, स्वप्निल सावंत, स्वप्निल पवार,सुमित मोरे, संग्राम फडतरे,महिला पोलिस अमलदार माधुरी शिंदे, कोमल पवार, गायत्री गुरव यांनी सहभाग घेतला होता

# राहत्या घरातून एकजण बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:**

राहत्या घरातून एकजण बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, कोडोली, सातारा येथून संजय अशोक पन्हाळकर (वय ३८, रा. देगाव रोड, कोडोली) हे दि. २१ जून रोजी कामाला जातो, असे सांगून घरातून गेले. मात्र ते परत आले नाहीत.

# जयवंत कॉलेजमध्ये आर.जे.मनीष सोबत 'वन डे विथ रेडिओ मिर्ची' कार्यक्रमाची धूम!

**किल्ले मच्छिंद्रगड/प्रतिनिधी:**

जयवंत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक येथे 'वन डे विथ रेडिओ मिर्ची: आर.जे. मनीष' हा विशेष कार्यक्रम नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, करिअर मार्गदर्शन आणि मनोरंजनाचा एक संस्मरणीय संगम अनुभवता आला.

कार्यक्रमात रेडिओ मिर्चीचे प्रसिद्ध आर.जे. मनीष यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत रेडिओ क्षेत्रातील करिअर संधींविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी नितीन रनदिवे यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. ए. जे. गुजर यांच्या हस्ते आर.जे. मनीष आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रथम वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी खास आयोजित केलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आर.जे. मनीषसोबत विविध मनोरंजक व संवादात्मक खेळांमध्ये सहभाग घेतला. ट्रुथ अँड डेअर,



रॅपिड फायर, टंग ट्विस्टर, डायलॉग गेसिंग यांसारख्या खेळांनी सभागृह हास्यविनोदांनी भरून गेले.

यावेळी 'चू तळीळेप इेरीव' या उपक्रमात सहभागी झालेल्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन डॉ. तबस्सुम अत्तार व जे. बी. जाधव यांनी केले. प्रा. सीमा मोरे, प्रा.नीलम वाघमारे, तसेच अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमैया मुल्ला या विद्यार्थिनीने अत्यंत प्रभावीपणे केले.

# दादासाहेब मोकाशी कृषि महाविद्यालचा शेरे येथे वृक्षारोपण कार्यक्रम

**कराड/प्रतिनिधी : -**

दादासाहेब मोकाशी कृषि महाविद्यालय आणि निसर्गसेवेचा ध्यास घेतलेल्या माऊली ग्रामविकास प्रतिष्ठान, शेरे यांच्या संयुक्त सहयोगाने दि. २८ जून रोजी शेरे (ता. कराड) येथे वृक्ष लागवड कार्यक्रम राबवण्यात आला.

मंगळवार (दि. १) जुलै रोजी महाराष्ट्र कृषि दिन व हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या पाचव्या सत्राच्या विद्यार्थ्यांनी २५० वृक्षलागवड करून शाश्वत आणि निरोगी भविष्याचा निर्धार केला.



निसर्ग एक सामाजिक बांधिलकी या जाणीवेतून मोकाशी कृषि विकास प्रतिष्ठानचे सचिव अभिजीत मोकाशी, उपाध्यक्ष डॉ. विश्वजित मोकाशी, संचालक विलास चौधरी, तसेच कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.एस. घुटुकडे यांनी या कार्यक्रमासाठी प्रोत्साहन दिले.

वृक्षारोपणप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे प्रा.आर.एस. जाधव, प्रा.बी.बी. चव्हाण, तसेच माऊली ग्रामविकास प्रतिष्ठानचे वैभव पाटील उपस्थित होते.


सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

## नशिबाची परीक्षा

गुरुवार ०३ जुलै २०२५

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल ७-३-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 179<br>278<br>377 | 7-6 | 150<br>240<br>600 | 70-46-31-52-69 |

### कल्याणम

उदय-अस्त सिंगल ०-२-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 145<br>235<br>550 | 0-3 | 120<br>670<br>300 | 07-13-26-89-34 |

### मुंबैम (मेन )

उदय-अस्त सिंगल २-५-७ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 156<br>129<br>110 | 2-4 | 130<br>149<br>112 | 20-84-51-79-43 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

## आज का अंदाज

गुरुवार दिनांक ०३ जुलै २०२५

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| १ - ४ - ७ - ८ | २ - ५ - ६ - ७ |
| ३३५-१६७-८९०-१८९ | १४७-४५६-२७७-१३३ |
| ४७०-५९०-३४०-३७८ | ३४५-१७७-११४-४६७ |
| ५६०-६८०-२५०-२२४ | २००-२५८-७९०-२५० |
| जोडी | जोडी |
| १० -४० - ७२ - ८२ | २० -५० - ६८ - ७८ |
| १९ -४९ - ७३ - ८३ | २१ -५१ - ६९ - ७९ |
| १६ -४६ - ७५ - ८५ | २२ -५२ - ६४ - ७४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ०३-०४ जुलै

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

गुरुवार दिनांक ०३ जुलै २०२५

सर्व बाजार साठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २४ | ३४ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६५ | ९५ |
| १३८ | १५७ | २४० | २३४ |
| २४६ | ३४६ | ३५८ | ४५० |
| ६७९ | ४९० | ११४ | ३६० |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# प्रधानमंत्री योजनांच्या लाभासाठी बँकांनी अभियान राबवावे: जिल्हाधिकारी

**सातारा/प्रतिनिधी : -**

वित्तीय समावेशनामध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना, प्रधानमंत्री बिमा सुरक्षा योजना व अटल पेन्शन योजना या योजनांचा समावेश आहे. या योजनांचा अधिकाधिक लाभ नागरीकांना व्हावा या उद्देशाने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या तीन महिन्याच्या कालावधीत सर्व ग्रामपंचायतस्तरावर बँकांनी अभियान राबवावे, अशा सूचना जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिल्या.

प्रधानमंत्री जनधन योजनेतील बंद पडलेली खाती सुरु करण्यासाठी केवायसी पुनःपडताळणी करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केली आहे. जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येच्या ४ टक्के कुटुंबे अद्याप बँकींग सेवेपासून वंचित आहेत. अशा कुटुंबांना या शिबीराच्या माध्यमातून जनधन योजनेचा लाभ मिळवून द्यावा. तीन महिन्याच्या कालावधीत दर शनिवारी विशेष आयोजन करावे, स्थानिक लोकप्रतिनीधी, शासकीय अधिकारी यांना शिबीरामध्ये आमंत्रित करावे. प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना, प्रधानमंत्री बीमा सुरक्षा योजना व अटल पेन्शन योजना या योजनेतील लाभार्थी संख्या वाढवावी. बँक सेवेपासून वंचित असलेल्यांना प्रधानमंत्री जनधन योजनेचा लाभ मिळवून द्यावा.

सर्व ग्रामपंचायतींमध्ये शिबीरांचे आयोजित करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित बँकांकडे देण्यात यावी. ग्रामपंचायत मुख्यालय किंवा सर्वांना सोयीच्या ठिकाणी शिबीराचे आयोजन करावे. बँकेच्या वरीष्ठ अधिकारी यांनी शिबीरांच्या ठिकाणी भेटी देण्याबाबत नियोजन करावे. गट, गाव व पंचायत स्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अभियानात सहभाग नोंदवावा. तालुक्यातील सर्व अधिकारी यांना ग्रामपंचायत निहाय नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करावे व या नोडल अधिकाऱ्यांचा आढावा दर आठवड्याला घेण्यात यावा, अशाही सूचना जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केल्या.

# जन सुरक्षा कायद्याला घराघरांतून विरोध केला पाहिजे: पंजाबराव पाटील

**कराड/प्रतिनिधी : -**



राज्य सरकार नवीन जन सुरक्षा कायदा करण्याचा प्रयत्न करत आहे. खरंतर, यापूर्वी सर्वसामान्य लोकांनी आपले प्रश्न सोडविण्यासाठी सहकार दरबारी आवाज उठवू नये, आंदोलन करू नये, यासाठी कायदे करून ठेवलेले आहेत. त्यातच आता जन सुरक्षा कायद्याच्या माध्यमातून राज्यातल्या सर्वसामान्य जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न या कायद्यातून त्यामुळे या कायद्याला घराघरांतून विरोध केला पाहिजे, असे आवाहन बळीराजा शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंजाबराव पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

या पत्रकात म्हटले आहे की, एकीकडे शेतकऱ्यांचे शोषण सुरू आहे. दुसरीकडे अन्यायाविरुद्ध बोलायचे नाही, ही भूमिका सरकारची आहे. यासाठी राज्यातल्या गावागावांतील तरुण शेतकऱ्यांनी या कायद्याला विरोध केला पाहिजे. ग्रामसभा घेऊन जन सुरक्षा कायद्याविरोधात ठराव करून सरकारला पाठविण्यात यावेत.

याशिवाय आपल्यापुढे दुसरा पर्याय नाही. बळीराजा शेतकरी संघटनेचा जन सुरक्षा कायद्याला कायमच विरोध आहे.

# सहकार चळवळीच्या संवर्धनासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम

## जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रिक

**सातारा/प्रतिनिधी:**

'सहकारी संस्था-चांगल्या जगाच्या सर्वसमावेशक व शाश्वत निर्मितीसाठी' या घोषवाक्यासह शासनाने सन २०२५ आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष घोषित केले आहे. ६ जुलै केंद्र सरकारच्या सहकारीता मंत्रालयाचा ४ था स्थापना दिवस असून त्यानिमित्त दिनांक १ ते ६ जुलै २०२५ या कालावधीत सहकार चळवळीच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती सातारा सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रिक यांनी दिली.

या कार्यक्रमाअंतर्गत १ जुलै ते ६ जुलै २०२५ या कालावधीमध्ये जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक, युवती, नागरीक, सहकारी संस्था त्यांचे सभासद, पदाधिकाऱ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत १ जुलै रोजी लाडकी बहिण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी नागरी सहकारी पतसंस्थेची नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शन व चर्चासत्र घेण्यात आले. दि. २ जुलै रोजी सहकार खात्याच्या अधिनस्त कार्यालये तसेच विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून वृक्ष लागवडीचे आयोजन करण्यात आले आहे. ३ जुलै रोजी सहकार खात्यांच्या अधिनस्त कार्यालयांमध्ये व विविध सहकारी संस्थांच्या कार्यालयांमध्ये स्वच्छता मे सहकार या उपक्रमांतर्गत कार्यालय परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. ४ जुलै रोजी सातारा येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या किसनवीर सभागृहात आदर्श लेखापरिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ५ जुलै रोजी सहकार चळवळीमध्ये युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी विद्यार्थी युवकांसाठी सहकारीता अभ्यास व प्रशिक्षणाबाबत जागृती चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ५ व ६ जुलै रोजी धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था सातारा यांच्या सभागृहात सहकारी संस्थांच्या उत्पादनांचे माहिती व विक्रीसाठी प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. सातारा जिल्ह्यातील विद्यार्थी युवक, युवती नागरिक, सहकारी संस्था त्यांचे सभासद, पदाधिकारी यांनी आंतराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा उपनिबंधक श्री. सुद्रिक यांनी केले आहे.

# प्राचार्य डॉ.एस.बी.केंगार यांना सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार जाहीर

**कराड/प्रतिनिधी : -**



यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराडचे प्राचार्य डॉ. एस. बी. केंगार यांना सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्व, विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संवर्धन, अध्यापनातील नवोपक्रम, महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासातील त्यांच्या भरीव योगदानाची दखल घेत त्यांचा या पुरस्काराने सन्मान करण्यासाठी, तसेच समर्पण आणि शिक्षणातील योगदानाचे कौतुक करण्यासाठी हा प्रतिष्ठित पुरस्कार इंडियन टॅलेंट ओलंपियाडद्वारे जाहीर करण्यात आला.

प्राचार्य डॉ. एस. बी. केंगार यांनी हा पुरस्कार संपूर्ण महाविद्यालयाचे प्राध्यापक, पालकांच्या आणि विद्यार्थ्यांचे श्रेय मानले आहे. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, हा पुरस्कार म्हणजे जबाबदारी अधिक वाढल्याची जाणीव आहे. आगामी काळात शैक्षणिक गुणवत्ता आणि मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी अधिक जोमाने काम करत राहणार आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ विद्यानगर, कराडचे चेअरमन बाळासाहेब पाटील, जनरल सेक्रेटरी अल्ताफहुसेन मुल्ला, तसेच संस्थेचे सदस्य व विश्वस्त अरुण पाटील (काका), सर्व संस्था सदस्य, ज्युनियर व सीनियर कॉलेजचे प्राध्यापक, कराड शहर व कराड परिसरातील मान्यवर व्यक्ती, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांनी प्राचार्य केंगार यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पत्नीचा जाचहाट केल्याप्रकरणी पतीवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**

पत्नीचा जाचहाट केल्याप्रकरणी पतीविरोधात सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पत्नीचा जाचहाट केल्याप्रकरणी संजय उत्तम कांबळे (वय ५३, रा.कृष्णानगर, सातारा) याच्याविरुध्द सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पत्नी उर्मिला संजय कांबळे (वय ४४, कृष्णानगर, सातारा) यांनी तक्रार दिली आहे. २००३ पासून वेळोवेळी शारीरीक छळ करत शिवीगाळ, दमदाटी केली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस हवालदार जाधव करीत आहेत.

# विवाहाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी एकाविरोधात गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**

महिलेला विवाहाचे आमिष दाखवून शारीरीक संबंध ठेवून गर्भवती केल्याप्रकरणी पंकज दोभाडा (रा.दहिगाव ता.माळशिरस जि.सोलापूर) याच्या विरुध्द सातारा शहर पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अत्याचाराची ही घटना नोव्हेबर २०२३ ते एप्रिल २०२५ या कालावधीत घडली आहे. शारीरीक संबंध ठेवल्यानंतर संशयिताने महिलेला विवाहास नकार दिला. तसेच मारहाण करत शिवीगाळ दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस उपाधिक्षक अतुल सबनीस करीत आहेत.

# निष्ठापूर्वक अध्यापनाने डॉ.कणसे यांच्या सेवेचे सार्थक

**वाई/प्रतिनिधी:**



प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी करण्याने डॉ. हणमंत कणसे यांच्या सेवेचे सार्थक झाले, असे प्रतिपादन कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. रमेश कुंभार यांनी केले.

येथील किसन वीर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हणमंत कणसे यांचा सेवानिवृत्तीबद्दल राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) अध्यक्ष डॉ. आर के चव्हाण, वाईचे माजी नगराध्यक्ष अनिल सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील म्हणाले, किसन वीर महाविद्यालय गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी घडविण्यात अग्रेसर आहे. शिवाजी विद्यापीठात या महाविद्यालयाचा लौकिक ही डॉ.कणसे यांच्यासारख्यांच्या निष्ठापूर्वक अध्यापनाची फलश्रुती आहे.

यावेळी श्रीकांत जगदाळे, अल्पना यादव, डॉ. उल्का कदम, ड. चंद्रशेखर जगताप, प्रा. रमेश डुबल, प्रा.भानुदास आगेडकर, प्रा. बी एस पटकुरे, स्नेहल जगदाळे यांनी मनोगत व्यक्त केले.

राजेश गुरव यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. प्रा. डॉ.विपिन वैराट यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. निर्मला कणसे यांनी आभार मानले.



मुस्लिम समाजाच्या वतीने संग्राम देशमुख यांचा सत्कार करताना मान्यवर व ग्रामस्थ.

# मुस्लिम समाजाच्यावतीने संग्राम देशमुख यांचा सत्कार

**कडेगाव/प्रतिनिधी : -**

सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्राम संपतराव देशमुख यांची सांगली जिल्हा नियोजन समिती कार्यकारी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कडेगाव मुस्लिम समाजाच्यावतीने माजी उपनगराध्यक्षा व विद्यमान नगरसेविका नाजनींन पटेल यांच्या पटेलनगर येथील निवासस्थानी समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कडेगावचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख, उपनगराध्यक्ष पै. अमोल डांगे, सभापती विजय गायकवाड, नगरसेवक निलेश लंगडे, संदीप गायकवाड, सुनील गाढवे, संतोष डांगे, माजी नगरसेवक हाजी शौकत पटेल, हाजी मुक्तार पटेल, हाजी सलामत पटेल, कुदरत पटेल, शकील पटेल, नूरअली पटेल, हरून पटेल, फीरोज पटेल, मुजीप मुजावर, समीर मुल्ला, तौसीफ इनामदार, अख्तर पटेल, हजरत पटेल, जगदीश लोखंडे, युवराज राजपूत, प्रकाश नलवडे, महेश जावीर, प्रकाश गायकवाड, नंदू रजपूत, रोहित देशमुख, युवराज लोखंडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# अजिजभाई शेख यांच्यातर्फे वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप

**वडूज/प्रतिनिधी : -**

फलटण येथील बारस्कर गल्लीतील सामाजिक कार्यकर्ते अजिजभाई शेख यांनी वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप केले. श्री. शेख यांनी सलग पंधरा वर्षे अखंडीतपणे हा उपक्रम कायम ठेवला आहे.

श्री. शेख हे जुन्या पिढीतील नामांकीत टेलरींग व्यवसायिक असून ते वसिम मेन्स वेअरचे संचालक आहेत. व्यवसायाबरोबरच त्यांनी सामाजिक बांधिलकीचे उपक्रम कायम जपले आहेत. येथे दरवर्षी येणाऱ्या श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यादरम्यान दिंडीतील वारकऱ्यांना चहा, भजी, मिसळ पाव, वडापाव अश्या अल्पोपहाराबरोबरच शाकाहारी दालचा व महाप्रसाद वाटप करीत असतात.

याशिवाय येथील घोड्यांच्या यात्रेत भाविकांना थंड पाण्याची उपलब्धता करून देत असतात. उन्हाळ्या दरम्यान दुकाना जवळच स्वयंस्फूर्तीने पाणपोई सुरू करून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय करून देतात. बारस्कर गल्लीतील गौसपाक उरुसानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करीत असतात. शेख यांनी विविध समाज विधायक उपक्रम राबवून वेगळ्या पध्दतीने सामाजिक ऐक्य व सामाजिक बांधिलकी जपली आहे. श्री. शेख यांना अनिल शहा, दादासाहेब निंबाळकर, प्रदीप मोरे, प्रताप निंबाळकर, अश्फाक शेख आदींचे सहकार्य लाभले.



फलटण : वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप करताना अजिजभाई शेख व सहकारी.

# सत्तर वृक्षांचे रोपन व चाळीस लोकांचे रक्तदान

## विविध कार्यक्रमांनी भारतीय स्टेट बॅन्केचा वर्धापन दिन साजरा

**वडूज/प्रतिनिधी : -**

भारतीय स्टेट बॅन्केच्या वडूज शाखेकडून बँकेचा सत्तरावा वर्धापन दिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शाखेकडून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ४० रक्तदात्यांनी आपला सहभाग नोंदविला. शाखेकडून रक्तदात्यांना भेटवस्तू व अल्पोपहार देण्यात आला.

वडूज कृषी उत्पन्न बाजार समीतीचे अध्यक्ष व मित्र मंडळ, सर्व सभासद यांनी यावेळी मोठया संख्येने रक्तदान केले. तसेच शाखेच्या ग्राहकांनी व कर्मचाऱ्यांनीही यावेळी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले.

बँकेचा सत्तरावा वर्धापन दिन असल्याने वडूज येथील हिंगणे रस्त्यावर ७० वृक्षांचे रोपन करण्यात आले. सायंकाळी केक कापून उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.

भारतीय स्टेट बॅन्केस आज रोजी सत्तर वर्ष पुर्ण झाली असून बॅन्केच्या प्रत्येक शाखेकडून विविध उपक्रम राबविणेत आले आहेत. प्रयास सामाजिक संस्थेच्या १ लाख ११ हजार १११ झाडांच्या वृक्ष लागवडीच्या ध्येयास भारतीय स्टेट गॅन्केकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे वडूज शाखेचे शाखाधिकारी सुरज कुंभार यांनी सांगितले. यावेळी बँक अधिकारी महेश वाघमारे, कैलास मुंढे, अतुल शिंदे, प्रयास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुंडलिक मांडवे, वैभव शहा, मदन जगताप, संतोष चव्हाण, हेमा कुंभार, स्नेहल वाघमारे, अजय खुस्पे, बशिर आत्तार आदी मान्यवर उपस्थित होते.




वडूज : हिंगणे रोडवर स्टेट बँकेच्यावतीने वृक्षारोपन करताना बँकेचे अधिकारी व कर्मचारी. (छाया : दत्ता इनामदार)

# वसंतराव नाईक कृषी संस्कृतीला नवसंजीवनी देणारे महानायक

## अशोकराव थोरात

**कराड/प्रतिनिधी : -**

वसंतराव नाईक कृषी संस्कृतीला नवसंजीवनी देणारे महानायक आहेत. आज त्यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषि दिनी अन्नदात्या शेतकऱ्यांचा सर्वत्र सन्मान केला जातो, असे प्रतिपादन शेतीमित्र अशोकराव थोरात यांनी केले.

समाजप्रबोधन सार्वजनिक वाचनालय, मलकापूर येथे हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक जयंती व कृषी दिनानिमित्त कृषी विषयक ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व प्रगतशील शेतकरी प्रकाश पवार यांच्या हस्ते व शेतीमित्र अशोकराव थोरात, सुनिल पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच संपन्न झाला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



याप्रसंगी श्री. थोरात यांनी कृषीप्रधान भारत म्हणून ओळखल्या जाणत्या देशात कृषी संस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून आजच्या दिवसाला अनन्य साधारण महत्व असल्याचे अधोरेखित करून तरुण पिढीने शेतीकडे वळावे व शेतीत आपले करिअर करावे, असे आवाहन करून शेतीमालाला योग्य भाव मिळावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी राज्यकर्त्यांकडे केली.

प्रगतशील शेतकरी प्रकाश पवार यांनी शेतकरी कारखानदार झाला पाहिजे, हे वसंतराव नाईक यांचे स्वप्न, स्वप्नचं राहिले असल्याची खंत त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.

याप्रसंगी विविध प्रकारची २३५ शेती विषयक ग्रंथ, मासिक यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यास परिसरातील शेतकरी व विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, सभासद, श्री मळाई देवी शिक्षण संस्थेच्या विविध विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, वाचक, हितचिंतकांनी भेट दिली.

कार्यक्रमास पोलीस पाटील प्रशांत गावडे, वाचनालयाच्या उपाध्यक्षा सौ. सुरेखा खंडागळे, सचिव विशांत थोरात, खजिनदार मारुती फराळे, संचालक सदस्य सौ. रंजना काटवटे, सुधीर लादे, दत्तात्रय शिर्के, ग्रंथपाल सौ. वैशाली शेवाळे, लिपिक शुभांगी चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सविता कोळी, सुधाकर शिंदे यांनी आभार मानले.

# आदर्श सीबीएसई शाळेच्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय अबॅकस व वैदिक गणित स्पर्धेत उत्तुंग यश

**विटा/प्रतिनिधी:**



गोवा येथे १५ जून २०२५ रोजी पार पडलेल्या दहाव्या आंतरराष्ट्रीय अबॅकस व वैदिक गणित स्पर्धेमध्ये आदर्श पब्लिक स्कूल, सीबीएसई (लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित) विटा शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन करत संपूर्ण खानापूर तालुक्याचे नाव उज्वल केले आहे.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीनुसार चॅम्पियन ऑफ चॅम्पियन, चॅम्पियन, फर्स्ट रँक, सेकंड रँक, थर्ड रँक अशा पाच प्रमुख गटांमध्ये रँकिंग करण्यात आले होते. त्यामध्ये चॅम्पियन ऑफ चॅम्पियन हा सर्वोच्च सन्मान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे: आयुष सागर मेतेकर (इ. १ ली), शौर्य निलेश माने (इ. २ री), शौर्या सुहास तळेकर (इ. ५ वी), सई उदय सुर्वे (इ. ६ वी), अमृत सिद्धेश्वर शिंदे (इ. ८ वी). चॅम्पियन गटात विजेते ठरलेले विद्यार्थी: रणवीर विशाल पाटील (इ. १ ली), सेजल उदय सुर्वे (इ. १ ली), श्रीविद्या गणेश कवाडे (इ. ७ वी). फर्स्ट रँक गटात स्थान मिळवणारे: सिद्धेश सागर मिसाळ (इ. २ री), आयान इब्राहिम मुल्लानी (इ. ६ वी).

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सदाशिवरावभाऊ पाटील, अध्यक्ष वैभवदादा पाटील आणि कार्यकारी संचालक पी. टी. पाटील यांनी विशेष अभिनंदन केले.

या यशामागे शाळेचे प्राचार्य लतिफ मणेर, पर्यवेक्षक किरण व राजश्री चव्हाण, तसेच बाह्य परीक्षा प्रमुख राजेंद्र कांबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या या प्रगतीमुळे संपूर्ण खानापूर तालुका व आदर्श शाळा परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आदर्श गुरुजन समाजासाठी आदर्श विद्यार्थी घडवतात

## चंद्रकांत दळवी

**पुसेगाव/प्रतिनिधी : -**

प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुजनांचे स्थान श्रेष्ठ असते. शालेय जीवनात मिळालेले आदर्श गुरुजन समाजासाठी आदर्श विद्यार्थी घडवत असतात. आदर्श विद्यार्थी व आदर्श गुरुजन ही समाजाची खरी श्रीमंती असते. खरा शिक्षक कधी सेवेतून निवृत्त होत नसतो. तो सतत समाज उन्नतीचे कार्य करण्यात मग्न असतो. स्पर्धेच्या या प्रचंड युगात भविष्यातील आव्हाने पेलणारा विद्यार्थी घडण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, असे विचार रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी व्यक्त केले.

निढळ येथे विजय मधुकर गुरव (गुरुजी) यांच्या सेवानिवृत्ती समारंभात श्री. गुरव यांचा मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे, जिल्हाध्यक्ष विश्वंभर रणवरे, नवनाथ जाधव, आबासाहेब जाधव, विशाल कणसे, नितीन घनवट, विठ्ठल फडतरे, एस. के जाधव, प्रल्हाद कुचेकर, अण्णा गुरव, दिडके गुरुजी, वैभव जगताप, विजय गोरे, कवितके गुरुजी, गोसावी साहेब, नलवडे गुरुजी, शेलार गुरुजी, गुरव समाज संघटना जिल्हाध्यक्ष नानासाहेब गुरव, मधुकर गुरव, किसनराव गुरव,डॉ. विश्वनाथ भांडवलकर, विनोद शिर्के, सौ. आराधना गुरव, सौ. पूजा गुरव, सौ. शुभांगी गुरव, पारायण मंडळ निढळ, आर्ट ऑफ लिविंगचे सदस्य, सज्जनगडचे पाटील महाराज, ग्रामस्थ व आजी-माजी गुरुजन व प्राथमिक शिक्षक समितीचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनाथ जाधव, सूत्रसंचालन मोहनराव गुरव, प्राचार्य जगदीश निर्मळ यांनी आभार मानले.



# सगाम कॉलेजचे एमएससीआयटी परीक्षेत उज्वल यश

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमधील, ज्युनिअर कॉलेज विभागाच्या विद्यार्थ्यांनी एमएससीआयटी परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उपप्राचार्य एस.एस. नांगरे व प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी उपप्राचार्य आर.वाय. पाटील, सद्गुरु गुरुकुल प्रकल्प प्रमुख प्रा. डॉ. विजयकुमार माळवदे, आर्ट्स विभागप्रमुख प्रा.एच.के. मांडके, प्रा.सौ. पवार, प्रा.पी.एल. कुंभार उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना उपप्राचार्य नांगरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अकरावी आणि बारावी या दोन वर्षांमध्ये अभ्यास करून मोठ्या कष्टाने हे यश प्राप्त केले आहे. जिद्द, चिकाटी, ध्येयप्राप्तीसाठी कष्ट करण्याची तयारी, अभ्यासातील सातत्य यामुळे कोणतेही ध्येय साध्य करता येऊ शकते.

यावेळी मुकुंद उराडे, कुमारी वैष्णवी बोराटे, दिग्विजय जमाले यांनी मनोगत व्यक्त केले.

एमएससीआयटी परीक्षेत राजन गावडे ९९.६५, देवकी पाटील ९७.८५, श्रेयश माळी ९७.७५, स्वरा लाटे ९७.७०, रविराज ढेरे ९७.४९, प्रियांका कोरे ९६.८३, प्रतिभा काटकर ९५.४३, विराज मोरे ९३.७०, अवंतिका जाधव ९३.१०, स्वरा उराडे ९२.७, गणेश उमापे ९२.५८, भाग्यश्री माळी ९२.४१, सचिन इंगवले ९१.६५, सार्थक भोसले ९१.५०, प्रद्युम्न पाटील ९८.९२, समृद्धी पाटील ९७.४९, शुभान काझी ९८.४७, ईशा सावंत ९८.५०, अस्मिता शिंदे ९५.११, दिग्विजय जमाले ९३.४८, दिशा लोहार ९२.९६, वैष्णवी बोराटे ९२.२४, अमरनाथ कोरे ९१.५६ या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार माळवदे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सौ. निता देशमुख, आर्ट्स विभाग प्रमुख प्रा. एच. के. मांडके यांनी आभार मानले.

# पुरस्कारांमुळे समाजातील संस्कृती सुदृढ:डॉ.पुजारी

## अ.भा.स्वाभिमानी संघर्ष सेनेतर्फे व्यंगचित्रकार अशोक सुतार यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार

**कराड/प्रतिनिधी:**

पुरस्कारांमुळे साहित्यिक, कला, क्रीडा क्षेत्रांतील व्यक्तींचा काम करणार्यांचा उत्साह द्विगुणित होतो. समाजातील विशेष कार्य करणार्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळते. समाजातील विशेष व्यक्तींच्या कार्याची थोरवी समजते, त्यामुळे संस्कृती सुदृढ होते, असे प्रतिपादन डॉ. कल्पना चावला विज्ञान केंद्राचे संचालक व विज्ञान प्रसारक डॉ.संजय पुजारी यांनी अ. भा. स्वाभिमानी संघर्ष सेना, महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा - २०२५ कार्यक्रमात केले.

सत्यवान मंडलिक लिखित इथे जन्मली माणुसकी या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा व पिराजी थोरवडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अ. भा. स्वाभिमानी संघर्ष सेना, महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा - २०२५ यशवंतरावजी चव्हाण स्मृति सदन टाऊन हॉल, कराड येथे दि.१ जुलै २०२५ रोजी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. त्यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.संजय पुजारी बोलत होते.



छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार स्विकारताना दैनिक प्रीतिसंगमचे अशोक सुतार

यावेळी अ. भा. स्वाभिमानी संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष पिराजी थोरवडे, कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष साहित्यिक सत्यवान मंडलिक, विशेष अतिथी दैनिक प्रीतिसंगमचे उप संपादक व आंतरराष्ट्रीय व्यंगचित्रकार अशोक सुतार, पत्रकार दशरथ पवार व उद्घाटक अ. भा. मराठा साहित्य परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विक्रम शिंदे हे व्यासपीठावर उपस्थित होते.

अ. भा. स्वाभिमानी संघर्ष सेनेने आयोजित केलेल्या पुरस्कार सोहळ्यात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. कल्पना चावला विज्ञान केंद्राचे संचालक डॉ.संजय पुजारी यांच्या हस्ते दैनिक प्रीतिसंगमचे उप संपादक व आंतरराष्ट्रीय व्यंगचित्रकार अशोक सुतार यांचा व्यंगचित्र क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी अशोक सुतार यांनी व्यंगचित्रकारितेतील अनेक अनुभव आपल्या मनोगतात व्यक्त केले.

सौ. अनिता चेतन घाटगे, सुहास चव्हाण, कांचन क्षीरसागर, सर्जेराव देशमुख व सौ अस्मिता देशमुख, संतोष पवार, शितलकुमार अर्धावर, संतोष पाटील, विजय चव्हाण, विश्वास निकम, संतोष डांगे, अमर जाधव, सौ. विजया माने, सौ विद्याताई मोरे, स्वाभिमानी साहित्यसेवा पुरस्कार कादंबरी: विशाल मोहोड, दिवाकर म्हात्रे, कथासंग्रह: गोकुळ गायकवाड, सौ. आरती लाटणे, शरद अत्रे, डॉ. सुनिता चव्हाण, तसेच कविता संग्रह,नाटक, आत्मचरित्र, ऐतिहासिक,वैचारिक लेख संग्रह,समिक्षा ग्रंथ,दिवाळी अंक - मुक्त संवाद पुरस्कार पुरस्कार्थी उपस्थित होते.

जागतिक विक्रमवीर गिर्यारोहक अन्वी घाडगे हिने शिव ललकारी देत उपस्थितांचे मन जिंकून घेतले. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या वेषात येऊन चित्रपट व टीव्ही कलाकार राजाराम काळे यांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष डांगे यांनी केले तर आभार किरण थोरवडे यांनी मानले.

# मॅरेथॉनसाठी आहार व दृष्टिकोन कसा असावा ?

## वर्ल्ड थेलेटिक्स कोच शिव यादव करणार मार्गदर्शन; सायकलपट्टूचा आज गौरव

**कराड/प्रतिनिधी : -**

मागील महिन्यात दक्षिण आफ्रिकेत झालेल्या कॉम्रेड मॅरेथॉन या ९० किलोमीटर धावण्याच्या जगातील सर्वात खडतर स्पर्धेत यश मिळवणाऱ्या कराडच्या सुपुत्रांचा आज सायंकाळी गौरव होणार आहे. यावेळी वर्ल्ड अथलेटिक कोच शिव यादव हे धावण्याची सुरुवात कशी करावी ? मॅरेथॉन वेळी योग्य आहार व सकारात्मक दृष्टिकोन कसा ठेवावा ? यासह विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

जगातील सर्वात जुनी व सर्वात खडतर मानली जाणारी दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन ही ९० किलोमीटर धावण्याची स्पर्धा कराड तालुक्यातील डॉक्टर सी व्ही महाजन, डॉक्टर शैलेश पाटील आणि संदीप पाटील यांनी पूर्ण केली आहे. ही ऐतिहासिक कामगिरी करत कराड तालुक्यातील पहिले तीन धावपट्टू होण्याचा बहुमान मिळवणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांचा कराड अर्बन बँकेच्या शताब्दी सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता यथोचित सन्मान केला जाणार आहे. त्याचबरोबर कराड ते श्रीक्षेत्र पंढरपूर ही सायकलवारी प्रथमच पूर्ण करणाऱ्या अनन्या देशमुख, श्रावणी किरपेकर, माधुरी पंचारिया आणि जागृती गुरसाळे यांच्यासह सर्वात कमी वयात सायकलवारी करणाऱ्या शौर्य बेलापुरे याचाही यावेळी गौरव केला जाणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे वर्ल् थलेटिक्स कोच शिव यादव हे मॅरेथॉन किंवा धावण्याची सुरुवात कशी करावी? चालणे हा व्यायाम का आणि कसा करावा? आणि त्यातील योग्य तंत्र, फायदे व नियमितता या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. त्याचबरोबर आज धकाधकीच्या जीवनात कामाच्या व्यापात व्यायामासाठी वेळ कसा काढावा? ४० वर्षांनंतर धावणे आणि चालणे - विशेष काळजी आणि टिप्स या विषयावरही ते संवाद साधणार आहेत. तसेच मॅरेथॉनसाठी तयारी करताना आहार, झोप आणि मानसिक दृष्टिकोन कसा हवा ? या विषयावर सुद्धा शिव यादव मार्गदर्शन करणार आहेत.

कराड अर्बन बँकेच्या शताब्दी सभागृहात अर्बन कुटुंब प्रमुख सुभाषराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सन्मान सोहळयास अर्बन बँकेचे चेअरमन डॉ. सुभाष एरम, पोलीस उपअधीक्षक अमोल ठाकूर, कराडचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, कराड अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सीए दिलीप गुरव, वर्ल्ड अथलेटिक्स कोच शिव यादव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या प्रेरणादायी सन्मान सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन सह्याद्री रनर्स ग्रुपकडून करण्यात आले आहे.

# प्राथमिक शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी पुष्पलता बोबडे

## व्हा चेअरमनपदी संजीवन जगदाळे यांना संधी

**सातारा/प्रतिनिधी:**

प्राथमिक शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी प्राथमिक शिक्षक समितीच्या पुष्पलता संजय बोबडे तर व्हा. चेअरमनपदी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे संजीवन रामचंद्र जगदाळे यांची बिनविरोध निवड झाली. चेअरमनपदाची धुरा पुन्हा एकदा फलटणकडे गेली आहे. उदय शिंदे आणि सिध्देश्वर पुस्तके यांच्या नेतृत्वाखाली या निवडी करण्यात आल्या.



चेअरमन, व्हा. चेअरमन निवडीसाठी शिक्षक बँकेच्या सभागृहामध्ये निवड प्रक्रिया पार पडली. सहायक निबंधक राहुल देशमुख निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपस्थित होते.

प्राथमिक शिक्षक समितीचे सिध्देश्वर पुस्तके, उदय शिंदे, सुरेश पवार यांच्या नेतृत्वाखाली किरण यादव, सुरेश पवार, नवनाथ जाधव, महेंद्र जानुगडे, संजीवन जगदाळे, विशाल कणसे, विजय ढमाळ, संजय संकपाळ, विजय शिर्के, नितीन फरांदे, नितीन शिर्के, पुष्पलता बोबडे १६ संचालक निवडीवेळी एकत्र आले होते. संभाजीराव थोरात आणि बलवंत पाटील यांच्या नेतृत्वाखालील शशिकांत सोनवलकर, राजेंद्र बोराटे, निशा मुळीक, शहाजी खाडे, ज्ञानोबा ढापरे यांची यावेळी उपस्थिती होती. मावळत्या चेअरमन निशा मुळीक व व्हा. चेअरमन सुरेश पवार यांनी नवनियुक्त पदाधिकार्यांचा सत्कार केला.

यावेळी सातारा जिल्हा प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर रणनवरे, प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत यादव, प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हा सरचिटणीस संतोष मांढरे, अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष गणेश जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णासो भोसले यांची यावेळी उपस्थिती होती.

# ओझर्डे आणि कदमवाडी येथे तरुणांच्या जागृतेमुळे घरफोडीचा अयशस्वी प्रयत्न

**वाई/प्रतिनिधी:**

वाई तालुक्यातील ओझर्डे गावासह कदमवाडी येथील स्वराज कॉलनीत अज्ञात चोरट्यांच्या टोळीने प्रवेश करुन दोन ठिकाणी घरफोडी करण्याचा मध्य रात्रीच्या दरम्यान प्रयत्न केला पण घरातील आणी घरा शेजारील लोक आणी तरुण वर्ग जागा झाल्याने चोरट्यांचा घरफोडी करण्याचा उद्देश सफल होवु शकला नाही .

सविस्तर वृत्त असे कि ओझर्डे ता . वाई येथील रहिवासी असलेले भैरू पांडकर (पाटावरील ) यांच्या घरावर मध्य रात्री दिड वाजण्याच्या सुमारास अज्ञात ३ चोरट्यांनी घरफोडी करण्याचा प्रयत्न केला त्याच दरम्यान घरात झोपलेली माणसं जागी झाली आणी खिडकीतून



चोर चोर म्हणुन आरडा ओरडा केल्याने शेजारील राहणारे अंदाजे ५० जण जागे झाले आणी त्यांनी हातात काठ्या घेऊन पांडकर यांच्या घराकडे धाव घेतली माणस आपल्या दिशेने येतायेत हे चोरट्यांच्या लक्षात आल्यावर चोरटे पळु लागले त्यांचा पाठलाग येथील तरुणांनी केला पण अंधाराचा फायदा घेऊन ते लगतच्या ऊसात घुसल्याने चोरटे निसटले.

चोरट्यांचा ओझर्डे गावातील घरफोडीचा प्रयत्न अयशस्वी झाल्याने त्यांनी आपला मोर्चा ओझर्डे गावा पासुन एक कि .मी . अंतरावर असणाऱ्या कदमवाडी येथील स्वराज कॉलनी कडे वळवुन तेथील भिसे यांचे घर मध्य रात्री दोन वाजण्याच्या सुमारास फोडण्याचा प्रयत्न सुरू केला पण तेथेही घरातील व घरा शेजारील माणसे जागी झाल्याने तेथुन चोरट्यांनी पळ काढला . पण चोरट्यांनी घरफोडी करण्या साठी लागणारे आणलेले कटर एक लोखंडी रॉड इत्यादी साहित्य व कपड्यांची बेग पायातील तिघांच्या चप्पल एका टावेलला बांधून रस्त्या कडेच्या एका शेतात टाकुन पळुन गेले .

या गंभीर घटनेची माहिती गावचे पोलिस पाटील मच्छिंद्र कोदे यांनी भुईंज पोलिस ठाण्याचे सपोनी रमेश गर्जे यांना दिली त्यांनी तातडीने रात्र गस्तीवर असलेल्या दोन पोलिस गाड्या घटनास्थळी पाठवल्या त्यातील पोलिसांनी चोरटे पसार झालेल्या दिशेने ग्रामस्थांनच्या मदतीने शोध मोहीम राबविली पण दुर्दैवाने ति मोहीम अयशस्वी ठरली . आणी चोरटे पळुन जाण्यास यशस्वी झाले . अशा चोरट्यांचा. कायम स्वरुपी बंदोबस्त करण्या साठी भुईंज पोलिस ठाण्याचे सपोनी रमेश गर्जे व त्यांचे सहकारी अधिकारी आणी पोलिस कर्मचारी नवीन दिशा ठरविण्याच्या मनस्थितीत आहेत . पण या गंभीर घटने मुळे ओझर्डे गावांसह कदमवाडी येथील ग्रामस्थांन मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे .हे तितकेच खरे आहे .

# पेरण्या न झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी

## वाळवा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मागणी

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**

वाळवा तालुक्यातील अहिरवाडी, गाताड वाडी, तुजारपूर, लोणारवाडी आदी गावासह जून महिन्यातील मुसळधार पावसामुळे ज्या गावात पेरण्या झालेल्या नाहीत, त्या गावांचे पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांना राज्य शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी वाळवा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली. वाळवा तालुक्याचे तहसिलदार सचिन पाटील यांना नेर्ल्याचे सरपंच संजय पाटील, अहिरवाडीचे युवा कार्यकर्ते शशिकांत कदम यांच्या हस्ते मागणीचे निवेदन देण्यात आले.



इस्लामपूर येथे तहसिलदार सचिन पाटील यांना निवेदन देताना संजय पाटील. समवेत शशिकांत कदम, संभाजी पाटील, संभाजी जाधव, सचिन कोळी व युवक शेतकरी.

गेल्या जून महिन्यात प्रचंड पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची मशागत आणि पेरण्या करण्यास वेळच मिळाला नाही. अहिरवाडी, गाताडवाडी, तुजारपूर,लोणार वाडी आदी काही गावात ९० तक्क्याहून जादा शेतकऱ्यांना पेरण्या करता आलेल्या नाहीत. मग एखादा शेतकरी आपल्या शेतात पेरणीच करू शकला नाही, तर त्याला उत्पन्न काय मिळणार? त्याचा घर-प्रपंच कशावर चालणार?मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा दवा-पाणी खर्च तो कशातून करणार? शेतकरी उध्वस्त होईल. म्हणून राज्य सरकारने ज्यांच्या पेरण्या आलेल्या नाहीत, त्यांच्या शेताचे तातडीने पंचनामे करून सरकारच्या नियमानुसार या शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, असे निवेदनात म्हंटले आहे.

याप्रसंगी तरुण शेतकरी सुनिल कदम, अमर भोसले, सत्यजित कदम,सचिन चव्हाण, तसेच राष्ट्रवादी सेवादलाचे तालुकाध्यक्ष संभाजी जाधव, राजारामबापू बँकेचे संचालक संभाजी पाटील, युवक राष्ट्रवादीचे माजी शहराध्यक्ष सचिन पाटील, शकील जमादार प्रामुख्याने उपस्थित होते.

# बिबट्याच्या हल्ल्यात जर्मन शेफर्ड ठार

**चरेगाव/प्रतिनिधी : -**

कळंत्रेवाडी (ता. कराड) येथील माजी सैनिक सचिन सूर्यवंशी यांचा जर्मन शेफर्ड जातीचा पाळीव कुत्रा बिबट्याने ठार केला. सदरची घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून नागरिक भयभीत आहेत.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेल्या अधिक माहितीनुसार, बुधवार, दि. २ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास बिबट्याने सचिन सूर्यवंशी यांच्या बंगल्याच्या कंपाऊंडच्या आतमध्ये प्रवेश करत त्यांचे जर्मन शेफर्ड जातीच्या पाळीव कुत्र्यावर हल्ला करीत ठार गेले. त्यानंतर बिबट्याने कुत्र्याला अक्षरशः फरपटत नेऊन परिसरातील ऊसाच्या शेतामध्ये टाकले. नेहमीप्रमाणे सकाळी उठल्यानंतर सुभाष सूर्यवंशी यांनी आपले कुत्रे दिसत नाही, म्हटल्यानंतर सर्वत्र शोधाशोध केली असता बिबट्याच्या पायाचे ठसे, तसेच कुत्र्याला फरपटत नेल्याच्या खुणा आढळून आल्या. त्यानुसार बिबट्याचा माग काढला असता परिसरातील एका ऊसाच्या शेतापलीकडील बांधावर कुत्रे ठार झालेल्या अवस्थेत आढळून आले. या परिसरात पाळीव कुत्र्यांवर बिबट्याच्या सततच्या हल्ल्यांमुळे नागरिक भयभीत असून आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. त्याचबरोबर वासरे, शेळ्या,कोकरे, रेडकू यांसारख्या पाळीव पशुधनावर हल्ले होण्याची भीती वाढली आहे. प्रशासनाने याची योग्य ती दखल घेत उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

या परिसरात मानवी वस्तीत येऊन बिबट्याचे कुत्र्यांवरील हल्ले दिवसेंदिवस वाढत चालले असून भविष्यात बिबट्याच्या हल्ल्यामध्ये एखाद्या नागरिकाचा मृत्यू झाल्यानंतरच प्रशासनास जाग येणार का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

# मोबाईल चोरी करणारी परप्रांतीय महिला पोलिसांच्या ताब्यात

## सातारा शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई

**सातारा/प्रतिनिधी:**

येथील सेव्हन स्टार इमारतीमधील अंबिका मोबाईल शॉपी मध्ये गर्दीचा फायदा घेऊन नवीन मोबाईल चोरी करणाऱ्या परप्रांतीय महिलेला सातारा शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे . १९ हजार रुपये किमतीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे .सातारा शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेने ही कारवाई केली आहे .

या गुन्ह्याची माहिती अशी दिनांक २१ जून रोजी सेवन स्टार येथीलअंबिका मोबाईल शॉपी मध्ये एक अनोळखी महिला मोबाईल खरेदीच्या निमित्ताने आली होती .मोबाईल खरेदी करत असताना तिने ओढणीच्या आडून दुकानांमधील नवीन मोबाईलचा बॉक्स लपवला .कोणाच्या लक्षात आले नाही असे समजून ती तेथून सराईतपणे निघून गेली .या दुकानांमधील मोबाईलचा सीलबंद बॉक्स आढळून येत नसल्याचे दुकान व्यवस्थापनाच्या लक्षात आले सदरचा मोबाईल एका अनोळखी महिलेने चोरल्याचे लक्षात आल्यावर दुकान मालकांनी सातारा शहर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती

सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शाम काळे, पोलीस उपनिरीक्षक सुधीर मोरे यांच्यासह पथकाने खबऱ्याच्या माध्यमातून या महिलेची माहिती प्राप्त केली .ती महिला कर्नाटक राज्यातील असून यापूर्वी देखील तिने सोन्याच्या दुकानांमध्ये हातचलाखी करून सोने चोरी केल्याचे स्पष्ट झाले .ती महिला चोरी करून कर्नाटक राज्यात पळून जात असल्याची ही माहिती उपलब्ध झाली .या गुन्ह्यातील महिला कोरेगाव येथे आढळून आल्याची माहिती सातारा शहर पोलिसांना प्राप्त झाली. डीबी पथकाने महिला पोलिसांच्या मदतीने तिचा ठाव ठिकाणा शोधून तिला ताब्यात घेतले तिची चौकशी केली असता तिने आधी उडवा उडवीची उत्तरे दिली मात्र पोलिसांच्या स्टाईलने चौकशी सुरू झाल्यावर तिने मोबाईल चोरल्याचे कबूल केले .१९ हजार रुपये किमतीचा मोबाईल तिच्याकडून हस्तगत करण्यात आला.

या तपासामध्ये पोलीस हवालदार सुजित भोसले, निलेश जाधव, निलेश यादव, विक्रम माने, पंकज मोहिते, सचिन रिटे, इरफान मुलांणी, संतोष घाडगे, सागर गायकवाड, विशाल धुमाळ, मच्छिंद्रनाथ माने, सुशांत कदम, तुषार भोसले, सुहास कदम यांनी भाग घेतला होता .

# 'किसन वीर' कडून वारकऱ्यांच्या सेवेसाठी पाण्याचा टँकर

**वाई/प्रतिनिधी:**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांची पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, या उदात्त हेतुने राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा किसन-वीर साखर कारखान्याचे चेअरमन वाई-खंडाळा- महाबळेश्वर तालुक्याचे जननायक नामदार मकरंद (आबा) पाटील यांच्या नेतृत्वाखालील व्यवस्थापनाने वारकऱ्यांच्या सेवार्थ पिण्याच्या वाण्याच्या टँकरची सोय केलेली आहे.



या पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पुजन किसन वीर साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रमोद शिंदे यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करून तो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मार्गस्थ करण्यात आला.

यावेळी प्रमोद शिंदे म्हणाले की, आळंदीहुन निघालेल्या या वारीमध्ये सर्व स्तरातुन वारकरी सहभागी होत असतात. पंढरीच्या वारीमध्ये फक्त हरिनामाचा गजर व पुर्ण भक्तीभावाने वारकरी तल्लीन होत असतात. विठुरायाच्या दर्शनासाठी अतुर झालेले असंख्य वारकरी कित्येक किलोमीटरचा प्रवास पायी करून पंढरपुरी दशेनासाठी जात असतात. या वारकऱ्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवु नये, याकरिता नामदार मकरंदआबा पाटील, जिल्हा बँकेचे चेअरमन खासदार नितीनकाका पाटील यांच्या नेतृत्वाखालील कारखाना व्यवस्थापनाने वारकऱ्याच्या सेवेकरिता मागील तीन वर्षापासूनू कारखान्यामार्फत पाण्याचा टँकर देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

कार्यक्रमास कारखान्याचे संचालक रामदास इथापे, प्रकाश धुरगुडे, संजय कांबळे, अजय भोसले, दिपक जाधवराव, जांब सोसायटीचे चेअरमन विकास शिंदे, सचिन निकम, गोविंद शिंदे, शामराव शिंदे, चीफ अकौंटंट आर. जी. उन्हाळे, सुरक्षा अधिकारी पवन बाबर, यांच्यासह शेतकरी सभासद उपस्थित होते.

# नागेवाडीत बिबट्याची दहशत

## बिबट्याच्या हल्ल्यात बोकड ठार

**विटा / प्रतिनिधी:**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील नागनाथ नगर, नागेवाडी येथे घटनास्थळी नागरीकांतून मिळालेल्या माहितीनुसार व मोबाईल फुटेज व्हिडिओ द्वारे मिळालेल्या माहितीनुसार, नागेवडी चिखलहोळ रस्त्यावर महादेव फार्म हाऊस जवळ सदर झाडाझुडुपांमध्ये बिबट्या एका शेतकऱ्याला जनावरे फिरवण्यासाठी गेल्यानंतर निदर्शनास आला. सदर या संदर्भात व्हिडिओही मोबाईल मधून काढण्यात आला. पण काही क्षणातच या बिबट्याने तिथून धूम ठोकली.नागेवाडी येथील हणमंत मदने यांच्या बोकडावर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात बोकड जागी ठार झाला. या घटनेमुळे खानापूर तालुक्यातील नागेवाडी व आजूबाजूच्या परिसरात नागरिकांतून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



खानापूर तालुक्यातील नागेवाडी येथे पहिल्यांदाच बिबट्या शेतकऱ्यांच्या निदर्शनास आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या संदर्भात घटनास्थळी असणाऱ्या नागरिकांनी दूरध्वनीवरून या प्रकाराची माहिती वनविभाग अधिकारी व कर्मचारी यांना दिल्यानंतर अधिकारी कर्मचारी घटनास्थळी रवाना झाले. तसेच शेतकऱ्यांनी त्या परिसरात जात असताना, शेतामध्ये जात असताना मोबाईलचा आवाज वाढवणे, काठीला घुंगरे बांधणे, मोठ्याने आवाज करणे, काठी आदळणे असे प्रकार करत ऊसामध्ये किंवा कोणत्याही पिकांमध्ये जावे. परंतु जाताना आजूबाजूला लक्ष ठेवावे असे आवाहन वन विभागाचे अधिकारी यांनी त्या भागातील शेतकरी नागरिकांना केले आहे.

नागेवाडी परिसरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये, आम्ही सतर्क आहोत. परिसरात आमचे पेट्रोलिंग चालू आहे. - वन विभाग अधिकारी


# विटा कुंडल रोडवर व्हॅगनर चारचाकी गाडीचा अपघात

## चारचाकीतील चौघेजण गंभीर जखमी

**विटा/प्रतिनिधी:**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा - कुंडल रोडवर बुधवारी रात्री २ वाजून २० मिनिटांनी पंढरपूरहुन विटा शहरात वाळवा तालुक्यातील तांबवे येथील काही भक्तजन भाविक व्हॅगनर चारचाकी गाडी घेऊन खानापूर तालुक्यातील खंबाळे या गावाजवळ अपरात्री आल्यानंतर कुंडलकडून एका अज्ञात वाहनाच्या लाईटीचा प्रकाश चालकाच्या डोळ्यासमोर आल्याने. चालकाचा गाडीवरील ताबा सुटला व ही चारचाकी गाडी जाग्यावर चार ते पाच वेळा उलटी पलटी झाली.

या पलटी झालेल्या व्हॅगनरचा अपघातात नुकसान झाले आहे. अपघातानंतर आजूबाजूच्या नागरिकांनी व येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांनी रस्त्यावर पलटी झालेल्या गाडीतून जखमींना तातडीने बाहेर काढत रुग्णवाहिकेला फोन करून तसेच विटा पोलिसांना या संदर्भात फोनवरून माहिती दिली. विटा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदर पंढरपूरहून वाळव्याकडे ही चारचाकी गाडी निघाली होती.



यामध्ये वाळवा तालुक्यातील तांबवे या गावचे रहिवासी बाळासो सखाराम जगताप(७३), दिनकर बाबुराव चव्हाण (६२), बाळकृष्ण रामराव लोखंडे (६०), कृष्णा सयाजी शेळके (६५) हे या चारचाकी गाडीतील भक्त भाविक गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना विटा येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

सदर अपघात घटनास्थळी विटा पोलीस रात्री उशिरा पंचनामा करत होते. या अपघातानंतर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. चालकाच्या डोळ्यावर पुढील गाडीचा प्रकाश आल्याने हा अपघात झाल्याचे घटनास्थळी नागरिकांनी सांगितले.